cmyk

## संपादकीय

### नारीशक्तीला समानतेचा मार्ग

देशाच्या लोकशाही व्यवस्थेत महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे, या उद्देशाने लोकसभेत एकतृतीयांश म्हणजेच ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव हा केवळ एक राजकीय निर्णय नसून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले ऐतिहासिक पाऊल ठरू शकतो. केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने मांडलेला हा प्रस्ताव भारतीय राजकारणाच्या प्रवाहात मोठे वळण आणणारा ठरू शकतो, अशी व्यापक प्रतिक्रिया उमटत आहे. कारण, हा निर्णय केवळ संख्यात्मक प्रतिनिधित्वापुरता मर्यादित नसून समाजातील शतकानुशतकांच्या विषमतेला आव्हान देणारा आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२९ | शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### अंदमान समुद्रात प्रवाशांची बोट उलटली

पोर्ट ब्लेअर : मलेशियाच्या दिशेने जाणारी प्रवाशांची एक बोट अंदमान समुद्रात उलटली आहे. या दुर्घटनेत २५० हून अधिक लोक अद्याप बेपत्ता आहेत. या बोटीतून शेकडो लोक बेकायदेशीररीत्या प्रवास करत होते. यामध्ये बहुतांश स्थलांतरित मजूर आणि बांगला देशी नागरिकांचा समावेश होता. यातील बहुतांशी रोहिंग्या आणि बांगला देशी नागरिक आहेत. या घटनेत आतापर्यंत किमान ९ जणांना वाचवण्यात यश आले आहे. बांगला देश कोस्ट गार्डकडून बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे. बांगला देशी वृत्तपत्र 'द डेली स्टार'च्या अहवालानुसार, या बोटीवर स्थलांतरित (बहुतांश रोहिंगे) आणि बांगला देशी नागरिकांसह सुमारे २५० ते २८० लोक होते.

### चेक क्लिअरन्ससाठी विलंब झाल्यास बँक जबाबदार

दिल्ली : बँकेने कोणत्याही योग्य कारणाशिवाय ग्राहकाचा चेक वेळेत क्लिअरन्ससाठी सादर केला नाही, तर ती 'सेवेतील त्रुटी' मानली जाईल, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने १५ एप्रिल (बुधवार) रोजी दिला. या प्रकरणी न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत कॅनरा बँकेला ठोठावलेला दंड कायम ठेवला आहे. रिपोर्टनुसार, संबंधित ग्राहकाने २९ मे २०१८ रोजी एकूण १,०६,१०,७६८ रुपयांचे दोन धनादेश (चेक) कॅनरा बँकेत जमा केले होते. ह्या दोन्ही चेकची वैधता २ जून २०१८ रोजी संपणार होती. सुरुवातीला बँकेने तांत्रिक कारणास्तव हे चेक परत आल्याचे सांगितले. बँकेने ते तात्काळ पुन्हा सादर करणे आवश्यक होते, परंतु बँकेने विलंब केला. परिणामी, मुदत संपल्यानंतर ते चेक सादर केले गेल्याने जुना चेक म्हणून नाकारले गेले. बँकेने ३० आणि ३१ मे रोजी पुकारलेल्या बँक संपाचे कारण देत विलंब समर्थनीय असल्याचा दावा केला होता. मात्र, न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला. संपानंतर १ आणि २ जून हे कामकाजाचे दिवस उपलब्ध असतानाही बँकेने चेक सादर का केले नाहीत? असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला.

### इराणने शांतता करार पाळला नाही तर पुन्हा युद्ध– अमेरिका

वॉशिंग्टन : इराणने शांतता करार मान्य केला नाही, तर पुन्हा एकदा युद्ध सुरू होऊ शकते. इराणकडे तडजोड करण्याची संधी आहे, परंतु जर त्यांनी ती फेटाळली तर अमेरिका पुन्हा लष्करी कारवाई सुरू करेल. अमेरिकन फौजा पूर्णपणे तयार असून कोणत्याही क्षणी 'कॉम्बॅट ऑपरेशन' (लष्करी मोहीम) सुरू करू शकतात. अमेरिकन सैन्य राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशाची वाट पाहत असून, निर्देश मिळताच कारवाई सुरू केली जाईल, असा इशारा अमेरिकेच्या पेंटागॉनचे प्रमुख पीट हेगसेथ यांनी दिला आहे. हेगसेथ यांनी म्हटले आहे की, अमेरिका इराणवरील नौदल नाकेबंदी सुरूच ठेवेल. अमेरिका आपले धोरणात्मक उद्दिष्ट साध्य करत नाही, तोपर्यंत ही कारवाई सुरू राहील असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अमेरिकन जनरल डॅन केन यांनी सांगितले की, आतापर्यंत नाकेबंदीमुळे १३ जहाजे परतली आहेत. यापैकी बहुतांश जहाजे नाकेबंदीच्या सीमेच्या आत पोहोचल्यानंतर परतली, तर एका जहाजाने आधीच आपला मार्ग बदलला. २१ एप्रिल रोजी संपणाऱ्या शस्त्रसंधीपूर्वी अमेरिका आणि इराण कराराच्या जवळ पोहोचत आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१६ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३१६.५० क्विंटल | १,९०० | २,९०० | २,२६९ |
| ज्वारी/हायब्रिड: १३७.०० क्विंटल | १,५०० | ३,१५१ | २,३८७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १०.०० क्विंटल | ७,४०० | ७,४०० | ७,४०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ६४.०० क्विंटल | २,२५० | २,८९१ | २,५०३ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: २५.५० क्विंटल | ५,०५१ | ५,२२१ | ५,१०८ |

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा : ९ जिल्ह्यांतील ६६ हजार शेतकऱ्यांना ५३.७३ कोटींची मदत मंजूर

मुंबई । प्रतिनिधी

**अवकाळी पावसाने शेतपिकांचे नुकसान झालेल्या ९ जिल्ह्यांतील ६६ हजार ३१२ शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. ऑक्टोबर २०२५ ते नोव्हेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी ५३ कोटी ७३ लाख ७ हजार इतका निधी वितरणास राज्य शासनाने मंजूरी दिली आहे.**




विभागीय आयुक्त नागपूर, पुणे, अमरावती आणि संभाजीनगर यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुषंगाने शासनाने निधी मंजूर केला आहे. याबाबतचा शासन निर्णय गुरुवारी (दि. १६ एप्रिल) महसूल विभागाकडून जारी करण्यात आला. राज्यातील गोंदिया, वर्धा, सोलापूर, सातारा, बुलढाणा, यवतमाळ, नांदेड, लातूर आणि बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाने एकूण ४९ हजार ५११ हेक्टरवरील शेतपिकांचे नुकसान झाले होते. अवकाळी पावसाचा नागपूर विभागातील गोंदिया आणि वर्धा जिल्ह्यातील १,५०४ शेतकऱ्यांना फटका बसला होता. त्यांचे ६६५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. पुणे विभागातील सोलापूर, सातारा जिल्ह्यात ४,५६४ शेतकरी बाधित आहेत. त्यांचे २,९६६ हेक्टर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झाले. अमरावती विभागातील बुलढाणा, यवतमाळ जिल्ह्यातील एकूण ५१,७२९ शेतकऱ्यांना मदत मंजूर करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड, लातूर, बीड जिल्ह्यातील एकूण ८,५१५ शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे यासाठी शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत दिली जाते. केंद्र सरकारने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त राज्य शासनाने ३० जानेवारी २०१४ अन्वये अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण आणि आकस्मिक आग आदी स्थानिक आपत्तींमध्ये बाधितांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार मदत निधी मंजूर करण्यात आला आहे. ही मदत थेट लाभ हस्तांकरण (डीबीटी) पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात निधी वितरीत करावी. चालू हंगामामध्ये यापूर्वी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी वितरीत केलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तावांतर्गत मागणी करण्यात आलेल्या

▸▸ पान २ वर

## व्हीएसआरचा मालक व्हीके सिंग खरातचा 'भक्त'

### अमोल मिटकरींचा खळबळजनक आरोप; त्या दिवशी होता ठाण्यात

अकोला । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार अमोल मिटकरी यांनी बोंदू बाबा अशोक खरात आणि व्हीएसआर (तडठ) विमान कंपनीच्या संबंधांबाबत अत्यंत गंभीर आरोप केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. २७ जानेवारी रोजी अजित पवार नेमके कोणाच्या सांगण्यावरून विमानात बसले होते आणि त्यांना रस्ते मार्गाने जाण्यापासून कोणी रोखले होते, हे सर्व प्रश्न अद्याप गुलदस्त्यात असल्याचे मिटकरींनी म्हटले आहे. अमोल मिटकरी यांनी थेट आरोप केला आहे की, हा बोंदू बाबा अशोक खरात व्हीएसआर विमान कंपनीशी संबंधित असून, या कंपनीचा 'व्हीके सिंग' हा खरातचा मोठा भक्त आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निपक्षपाती चौकशी होणे गरजेचे आहे. अजित दादांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ पावले उचलावीत, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.**



मिटकरी यांनी अशोक खरातच्या १६ नोव्हेंबर ते ३१ जानेवारी या कालावधीतील कॉल डिटेल्स (उउऱ) आणि बँक खात्यावरील व्यवहारांची तपासणी करण्याची मागणी केली आहे. यात त्यांनी एक खळबळजनक मुद्दा मांडला की, तो या काळात ठाण्यातील एका हॉटेलमध्ये थांबला होता. जर सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी केली नाही आणि खरातचा सीडीआर काढला नाही, तर महाराष्ट्रातील जनतेचा आगडोम उसळेल.

▸▸ पान २ वर

## निशिकांत दुबेंकडून आदित्य ठाकरेंबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य

### » संसदेत सत्ताधारी विरोधक भिडले

दिल्ली ।वृत्तसंस्था

**संसदेत गुरुवारी 'नारीशक्ती वंदन' विधेयकावर चर्चा झाली. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत बोलत असताना भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव घेऊन अत्यंत वैयक्तिक आणि आक्षेपार्ह विधान केले. त्यामुळे संसदेत चांगलाच गदारोळ झाला.**



आक्षेपार्ह वक्तव्यानंतर खासदार अरविंद सावंत आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आक्रमक पवित्रा घेत निशिकांत दुबे यांनी माफी मागावी, अशी मागणी केली. विरोधी पक्षातील इतरही खासदार आक्रमक झाले. हा आक्रमक पवित्रा पाहून अध्यक्षांनी दुबे यांचे विधान पटलावर येणार नाही, केवळ सावंत बोलले तेवढेच पटलावर येणार असल्याचे सांगितले. संसदेत बोलताना मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा घेत अरविंद सावंत यांनी सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. सरकार काही राज्यांच्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून चलाखी करत आहे, असा आरोप त्यांनी केला. यावेळी दुबे यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव घेत

▸▸ पान २ वर

## जी.श्रीकांत छ.संभाजीनगरचे विभागीय आयुक्त

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाने प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल केले असून, भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी जी. श्रीकांत यांची छत्रपती संभाजीनगर विभागाच्या विभागीय आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भातील अधिकृत आदेश सामान्य प्रशासन विभागाने आज निर्गमित केले.**

जी. श्रीकांत: सध्या 'जल जीवन मिशन' (नवी मुंबई) येथे अभियान संचालक म्हणून कार्यरत असलेले जी. श्रीकांत आता छत्रपती संभाजीनगरचे नवे विभागीय आयुक्त असतील. ते श्री. जितेंद्र पापळकर यांची जागा घेतील. गंगाथरण डी.: जी. श्रीकांत यांच्या जागी आता गंगाथरण डी. यांची 'जल जीवन मिशन'च्या अभियान

▸▸ पान २ वर

## जालना मर्चंट बँकेला २३ कोटींचा गंडा

### रायचंद कुरंगळ अटकेत, ८ दिवसांची पोलीस कोठडी

जालना । प्रतिनिधी

पंचमुखी वेअर हाऊस या फर्म चा प्रो.प्रा.रायचंद सखाराम कुंरगळ याने जालना मर्चंट बॅके सोबत करारनामा केला आहे ज्यात वेअर हाऊसचे मालक यांनी मालधारक कर्जदारांचा माल साठवुन घेतल्यानंतर त्यांनी दिलेल्या मालाच्या पावती वर संबंधीत मालधारकांचे नाव, माल गोडावुन मध्ये असल्या बाबतचा वेअर हाऊसचा मालाचा टॅग क्रमांक देणे,




संबंधीत मालाला सुध्दा टॅग लावुन त्यावर पावती क्रमांक लिहने, मालधारकांनी माल ठेवल्या नंतर पंचमुखी वेअर हाऊसने दिलेल्या पावत्या आधारे संबधीत मालधारकांना जालना मर्चंट बँकेचे संबधीत शाखा कर्ज वितरीत करत होते.

बँकेच्या न्यु मार्केट यार्ड जालना शाखा,

▸▸ पान २ वर

## लोकांना मतदानासाठी सक्ती करता येत नाही -सर्वोच्च न्यायालय

दिल्ली । वृत्तसंस्था

निवडणुकांमध्ये मतदान न करणाऱ्या नागरिकांवर दंड आकारण्याची मागणी करणारी जनहित याचिका गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारण्यास नकार दिला. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने, अजय गोयल यांनी दाखल केलेली याचिका निकाली काढली. गोयल यांनी आपल्या याचिकेत,



मतदान न करणाऱ्यांवर सरकारी लाभांपासून वंचित ठेवण्यासारख्या परिणामांची मागणी केली होती. सुनावणीदरम्यान,

▸▸ पान २ वर

## राज्य शिक्षण विभागातील ११ उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

### बीडचे शेख जमीर यांचा समावेश

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट–ब (प्रशासन शाखा) मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. सन २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेतील शिफारस प्राप्त ११ पात्र उमेदवारांना अखेर राज्य शासनाने पदस्थापना जाहीर केली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने आज, १६ एप्रिल २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शासन आदेश निर्गमित केला.**



या आदेशानुसार, पात्र उमेदवारांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या महसूल विभाग व कार्यालयात नियुक्ती देण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील अधिकाऱ्यांचा समावेश आहे: भरत माधवराव कासले: अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), सोलापूर. धर्मराज मन्मथ काळमाते: गटशिक्षणाधिकारी, पं.स. औसा,

▸▸ पान २ वर

# खरीप हंगाम धोक्यात...!

### आयसीएआरचा इशारा; खत टंचाई, उत्पादन घट आणि महागाई वाढीची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

**देशातील आगामी मॉन्सून हंगामात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे भारतीय शेती क्षेत्रास मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर)च्या ताज्या अहवालात ही गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे.**

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार यंदा मॉन्सून पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या सुमारे ९२ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहण्याची शक्यता आहे. एल–निनो परिणामामुळे हंगामाच्या उत्तरार्धात पावसात घट होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, याचा थेट परिणाम खरीप पिकांच्या पेरणी व उत्पादनावर होऊ शकतो.



मागील वर्षी दमदार मॉन्सूनमुळे खरीप आणि रब्बी हंगामाला चांगला आधार मिळाला होता. मात्र, यंदा परिस्थिती बदलण्याची शक्यता असून, अपुऱ्या पावसामुळे उत्पादन घट, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम आणि अन्नसुरक्षेवर ताण निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यासोबतच पश्चिम आशियातील तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनी मार्गे होणाऱ्या खत व कच्च्या मालाच्या पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. परिणामी, खरीप हंगामात खत टंचाई निर्माण होऊन शेती उत्पादनावर आणखी नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आयसीएआरने वर्तवली आहे. अहवालानुसार, २०२७ आर्थिक वर्षासाठी कृषी क्षेत्रातील वाढीचा दर ३ टक्के राहण्याचा अंदाज आहे. मात्र, या वाढीसमोर हवामान व जागतिक परिस्थितीमुळे मोठी आव्हाने उभी राहणार आहेत. अन्नधान्यांच्या किमती वाढण्याची शक्यता असून ग्राहक किंमत निर्देशांक ४.५ टक्क्यांपेक्षा जास्त राहू शकतो. दरम्यान, २ एप्रिल २०२६ पर्यंत देशातील जलाशयांमध्ये ४७ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे. हा साठा मागील वर्षाच्या तुलनेत अधिक असला तरी कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर तो कितपत पुरेसा ठरेल,

▸▸ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नारीशक्तीला समानतेचा मार्ग:आरक्षणातून परिवर्तनाची नवी दिशा

देशाच्या लोकशाही व्यवस्थेत महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे, या उद्देशाने लोकसभेत एकतृतीयांश म्हणजेच ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव हा केवळ एक राजकीय निर्णय नसून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले ऐतिहासिक पाऊल ठरू शकतो. केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने मांडलेला हा प्रस्ताव भारतीय राजकारणाच्या प्रवाहात मोठे वळण आणणारा ठरू शकतो, अशी व्यापक प्रतिक्रिया उमटत आहे. कारण, हा निर्णय केवळ संख्यात्मक प्रतिनिधित्वापुरता मर्यादित नसून समाजातील शतकानुशतकांच्या विषमतेला आव्हान देणारा आहे.

भारतीय समाजरचनेत महिलांना दुय्यम स्थान देण्याची परंपरा खोलवर रुजलेली आहे. मात्र, शिक्षण, विज्ञान, क्रीडा, प्रशासन, उद्योग अशा विविध क्षेत्रांत महिलांनी आपली कर्तबगारी सिद्ध करत ही मानसिकता कालबाह्य ठरवली आहे. अनेक क्षेत्रांत त्यांनी पुरुषांनाही मागे टाकले आहे. त्यामुळे 'महिलांना संधी दिल्यास त्या सक्षम ठरतात' हे आज निर्विवाद सत्य झाले आहे. तरीदेखील राजकीय क्षेत्रात त्यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प राहिले आहे. याच पार्श्वभूमीवर आरक्षणासारख्या उपाययोजना आवश्यक ठरतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा प्रयोग आधीच राबविण्यात आला असून त्याचे सकारात्मक परिणामही दिसून येत आहेत. सुरुवातीला 'प्रॉक्सी राजकारण' म्हणून महिलांच्या नावावर पुरुषच कारभार चालवत असल्याचे चित्र होते. मात्र, कालांतराने महिलांनी स्वतःची ओळख निर्माण करत निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. आज अनेक महिला सरपंच, नगरसेविका आणि जिल्हा परिषद सदस्य प्रभावी नेतृत्व करताना दिसतात. हीच प्रक्रिया आता राष्ट्रीय पातळीवरही घडवून आणण्याचा प्रयत्न या विधेयकातून होत आहे.

महिलांच्या सक्षमीकरणाच्या या प्रवासात मानसिकतेतील बदल हा सर्वात मोठा अडथळा आहे. 'महिला असूनही' एखाद्या उच्च पदावर पोहोचल्याचे विशेषत्वाने नमूद करणे, हीच मानसिकतेतील विसंगती दाखवते. खऱ्या अर्थाने समानता तेव्हाच साध्य होईल, जेव्हा अशा उल्लेखांची गरज भासणार नाही. त्यामुळे आरक्षण हे अंतिम ध्येय नसून समानतेकडे जाण्याची सुरुवात आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

या प्रस्तावासोबत लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा मुद्दाही जोडलेला असल्याने त्यावरून वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेषतः दक्षिणेकडील राज्यांना त्यांच्या प्रतिनिधित्वात घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. लोकसंख्येच्या आधारे होणाऱ्या परिसीमनामुळे काही भागांना अधिक आणि काहींना कमी जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा विषय केवळ राजकीय नसून प्रादेशिक संतुलन राखण्याचाही आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता आणि न्याय राखणे अत्यंत गरजेचे ठरेल.

विरोधी पक्षांकडून या निर्णयामागे राजकीय हेतू असल्याचे आरोप होणे अपेक्षित आहे. मात्र, याआधी सत्तेत असताना अशा प्रस्तावांवर ठोस भूमिका न घेणाऱ्या पक्षांची भूमिका देखील तितकीच प्रश्नांकित ठरते. महिलांच्या सक्षमीकरणाचा मुद्दा हा राजकारणापलीकडे जाऊन पाहण्याची गरज आहे. कारण, हा प्रश्न देशाच्या सामाजिक आणि लोकशाही आरोग्याशी निगडित आहे.

महिलांना समान संधी देणे म्हणजे केवळ त्यांचे सक्षमीकरण नव्हे, तर देशाच्या प्रगतीचा वेग वाढविणे होय. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यास अधिक संवेदनशील, समतोल आणि व्यापक दृष्टिकोनातून धोरणे तयार होण्याची शक्यता असते. त्यामुळे या आरक्षणाचा परिणाम केवळ संसदेतल्या आकडेवारीपुरता मर्यादित न राहता समाजाच्या सर्व स्तरांवर सकारात्मक बदल घडवू शकतो.

अर्थात, या प्रक्रियेत अनेक अडथळे येणार आहेत. सामाजिक मानसिकता, राजकीय स्पर्धा, प्रादेशिक असमतोल यांसारख्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. मात्र, या सर्वांवर मात करत महिलांना समानतेचा हक्क देण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू राहणे आवश्यक आहे.

एकंदरीत, लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव हा नारीशक्तीला न्याय देण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही केवळ सुरुवात आहे; खऱ्या अर्थाने समानता प्रस्थापित करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने मानसिकतेत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. जेव्हा महिला आणि पुरुष यांच्यातील भेद पूर्णपणे नाहीसा होईल, तेव्हाच भारतीय लोकशाहीची खरी ताकद प्रकट होईल.

# कब्बाडगल्लीतील किरकोळ वादाला जातीय रंग देऊ नका-सर्वपक्षीयांचे आवाहन

## पोलीसांनी निष्पक्ष कारवाई करावी





**बीड। प्रतिनिधी**

शहरातील कब्बाडगल्ली येथे काही दिवसांपूर्वी माजी न.प.सभापती बाळासाहेब जाधव आणि सागर देशपांडे यांच्यात कचरा व बोअर समस्येवरून किरकोळ वाद झाला होता. यावेळी नगरसेविका पती सागर देशपांडे यांना जाब विचारल्यामुळे वाद वाढून दोघांमध्ये हलकी झटापट झाली. या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध परस्पर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, हा वाद स्थानिक पातळीवर मिटणारा असताना त्याला राजकीय स्वरुप देऊन जातीय रंग देत अनावश्यक प्रसिद्धी दिली जात असल्याचे सर्वपक्षीय संघटनाच्या शिष्टमंडळाने व्यक्त केले.

विविध पक्ष व संघटनांच्या शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.१६) पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांची भेट घेतली. यावेळी कब्बाडगल्ली येथील प्रकरणाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न होत असून पोलीस प्रशासनाने निष्पक्ष कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. सदरील प्रकरणामुळे कब्बाडगल्लीसह जिल्ह्याची आणि पोलीस प्रशासनाचीही बदनामी होत असल्याचे म्हटले आहे. दिलेल्या या निवेदनावर मराठा सेवक गंगाधर काळकुटे शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत नवले, जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे, अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन, संघटनेचेसंभाजी ब्रिगेडचे शरद चव्हाण, शिवसेना तालुकाध्यक्ष संतोष जाधव, मराठा आरक्षण कृतीसमीतीचे जयमल्हार बागल, काळकुटे, प्रा.किशोर काळे, जिजाऊ प्रतिष्ठान चे इंजि देवीसिह शिंदे, विनोद काळे, मंगेश काळे, भिमराव दळवी आदींच्या स्वाक्षरी आहेत.

### वैयक्तिक वादाला राजकीय रंग कशासाठी?– प्रा.किशोर काळे

प्रभागात विविध समाजातील नागरिक राहत असून हा केवळ कचरा व पाणी समस्येवरून झालेला वाद आहे. मात्र काहीजण स्वतःच्या फायद्यासाठी त्याला जातीय रंग देत असल्याचा आरोप प्रा. किशोर काळे यांनी केला. तसेच मी सुद्धा ब्राम्हण समाजाचा असून माझ्यावरील याच लोकांनी हल्ला केला होता, तेव्हा जात कुठे गेली होती? असाही सवाल त्यांनी उपस्थित केला.

### वाद वाढवू नका, सामोपचाराने तोडगा काढा –चंद्रकांत नवले

आज विविध संघटना एकत्र येऊन वाद मिटवण्याचा प्रयत्न करत आहोत. दोन्ही बाजूंनी संयम ठेवून चर्चा करुन विषय मार्गी लावावा. कारण क्षीरसागरांचे कामच वाद पेटवणे, भांडण लावणे असे आहे. या प्रकाराला कुणीही बळी पडू नये, आंदोलनाची भाषा केल्यास आम्हालाही आंदोलन करावे लागेल असे शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत नवले यांनी म्हटले.

### आंदोलनाच्या भाषेत दबाव टाकू नये–गंगाधर काळकुटे

जाधव व देशपांडे यांचा गल्लीतील किरकोळ वाद आहे. याप्रकरणी बीड शहर पोलीसांनी दोघांवरही कार्यवाही केलेली आहे. मात्र या प्रकरणाला जातीय व राजकीय वळण देऊ नये. तसेच डॉ.योगेश क्षीरसागरांनी आंदोलनाचा इशारा दिला. हा एक प्रकारे पोलीस प्रशानावर दबाव टकाण्याचा प्रयत्न आहे. असा दबाव न टकाता सामोपचाराचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहनही मराठा सेवक गंगधार काळकुटे यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**केज। प्रतिनिधी**

श्री.नरसिंह शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आज दि....शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप आणि वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आल्या वेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक गोपाळराव तांबडे अध्यक्ष नरहारी गदळे ईंग्रजी सांगळे हरिदास तांबडे सचिव धनंजय गदळे वसंतराव तांबडे सर वैजनाथ ऊगलमगले सरपंच मच्छिंद्र सांगळे गायकवाड अशोक तांबडे गोविंदराव सहशिक्षक महारूद्र तांबडे सहशिक्षक बबनराव गायकवाड पत्रकार जयद्रथ गायकवाड महादेव गायकवाड ईतर बहुसंख्य मान्यवरांसह ईतर सर्वच शिक्षकांसह मान्यवर नागरिक कांची यावेळी समयोचित भाषणे झाली संस्थेच्या या कार्यक्रमाची सर्वांनीच स्तुती केली.संस्थेतर्फे व्यंगचित्रकार धनंजय गदळे यांनी सर्वांचेच अभार व्यक्त करत सर्वांच्याच व परमेश्वराच्या आशीर्वादाने या संस्थेस अपंग,गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी उपेक्षित पिडीतांसाठी संस्थेने कामकाजासाठी बळ मिळो.

## माजी आ.बाळासाहेब आजबे यांना बंधुशोक

# विलासराव आजबे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**आष्टी । प्रतिनिधी**

**माजी आ. बाळासाहेब आजबे यांचे मधवे बंधू तथा माजी डीसीसी बँकेचे संचालक विलासराव आजबे यांचे गुरुवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. पहाटे अचानक छातीत दुखू लागल्यानंतर त्यांना तीव्र झटका आला आणि शिराळ येथील राहत्या घरीच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.**



त्यांच्या पार्थिवावर शिराळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. विलासराव आजबे यांच्या निधनाने आजबे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने सामाजिक व सहकार क्षेत्रातही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अंत्यविधीस आमदार सुरेश आण्णा धस, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर यांच्यासह गावकरी, नातेवाईक व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती देवो व आजबे कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

## सीबीएसई बोर्डच्या दहावी परीक्षेत स्वानंद हिरवे यांचे सुयश

**जालना । प्रतिनिधी**

**जालना– २०२६ या वर्षीच्या सीबीएसईच्या दहावीच्या जाहीर झालेल्या निकालात जालना येथील ऋषी विद्यालय खरपुडीचा विद्यार्थी स्वानंद श्रीपाद हिरवे जालना याने ८९.००% गुण घेऊन यश मिळविले आहे त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक नातेवाईक व परिसरात सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे**

## पान १ वरून...

### अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा : ९ जिल्ह्यांतील

निधीचा समावेश नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी आणि मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी जारी केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये, यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना जारी कराव्यात. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची राहील, असे शासन निर्णयात नमूद केले आहे.

-----------

### निशिकांत दुबेंकडून आदित्य

आरोप केला. तर दुबे असे बोलूच कसे शकतात, मग आम्ही ज्यांची नावे एपस्टीन फाइल्समध्ये आली किंवा जे तडीपार होते त्यांची नावे घ्यायची का, असे प्रत्युत्तर सावंत यांनी दिले. यावेळी संसदेत चांगलाच राडा झाल्याचे पाहायला मिळाले. अरविंद सावंत म्हणाले की, अलीकडेच महिला अधिकाऱ्यांचे एक संमेलन दिल्लीत पार पडले. यामध्ये एका मुलाखतीत एका अतिशय चांगल्या महिला अधिकाऱ्याने राज्यातील एका मंत्र्यावर आरोप केला की, एका मंत्र्याने महिला अधिकाऱ्याला नाकारले आणि हे महिला आरक्षणाबद्दल आणि सन्मानाबद्दल बोलतात. यांनी महिला संरक्षणाबद्दल बोलले पाहिजे, असा टोलाही लगावला.सावंत म्हणाले की, आम्ही महाराष्ट्रातून येतो, ज्या महाराष्ट्रात महिलांचा आदर केला जातो. महिला नेतृत्वाची फार मोठी परंपरा महाराष्ट्र राज्याला आहे. स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी, संत बहिणाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा यांचा वारसा महाराष्ट्राला आहे. महिला विधेयकाला आमचा पाठिंबा आहे. मात्र मतदारसंघ फेररचनेशी महिला आरक्षण जोडणाऱ्या घटनादुरुस्तीला आमचा विरोध आहे. सत्ताधारी पक्ष विरोधकांचा महिला आरक्षणाला विरोध असल्याचे खोटे नरेटिव्ह पसरवतो आहे. पण आम्हाला त्यांना सांगायचे की खुल्या प्रवर्गातूनही मुंबई महापालिकेच्या महापौरपदी आम्ही महिलांना संधी दिली. यावेळी सावतांनी किशोरी पेडणेकर, श्रद्धा जाधव, स्नेहल आंबेकर, शुभा राऊळ या मुंबईच्या माजी महापौरांचा नामोल्लेख केला.अरविंद सावंत यांनी संसदेत भाषण करताना कुलदीप सेंगर, ब्रुजभूषण सिंग या नेत्यांचा उल्लेख करत त्यांच्यावर महिला शोषणाचे आरोप आहेत आणि हे भाजपवाले आम्हाला नारीशक्ती सांगणार का? असा प्रश्न उपस्थित केला आणि महाराष्ट्राला लाभलेल्या उत्तुंग महिला नेतृत्वाची यादीच वाचून दाखवली. दरम्यान, दुबे यांनी थेट आदित्य ठाकरे यांचे नाव घेऊन आरोप केला. त्यानंतर विरोधी पक्षाचे सदस्य चांगलेच आक्रमक झाले. खासदार अरविंद सावंत यांच्यासह सुप्रिया सुळे, अखिलेश यादव, गौरव गोगोई, संजय दीना पाटील आदी खासदारांनी संसदेत चांगलाच गोंधळ घातला. निशिकांत दुबे असे बोलूच कसे शकतात? असे विचारत त्यांना माफी मागायला लावा, असा पवित्रा विरोधी पक्षाच्या खासदारांनी घेतला. यावेळी अध्यक्षांनी मध्यस्थी करत दुबे यांचे वक्तव्य पटलावर येणार नाही, असे म्हणत विरोधी पक्षांची समजूत काढली. त्यानंतर अरविंद सावंत यांनी पुढील भाषण केले.

----------

### व्हीएसआरचा मालक

ही संतापाची आग ईशान्येश्वर मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत पोहोचेल, असा इशाराही मिटकरी यांनी दिला आहे. अजित पवारांच्या सुरक्षेच्या संदर्भात झालेल्या या कथित षडयंत्रामागे नेमके कोण आहे, हे समोर येण्यासाठी खरातची चौकशी अनिवार्य असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील खरातला सर्वाधिक कॉल करणाऱ्यांमध्ये रूपाली चाकणकर यांचा दुसरा क्रमांक लागतो अशी धक्कादायक माहिती दिली. अशोक खरातला या काळात सर्वाधिक कॉल त्याच्या मुलीने केले होते. मात्र, त्याखालोखाल सर्वाधिक कॉल करण्यात दुसऱ्या क्रमांकावर राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर होत्या. असे म्हणत चौकशीची मागणी केली.

----------

### लोकांना मतदानासाठी सक्ती

न्यायालयाने सक्तीचे मतदान लागू करण्याच्या व्यवहार्यतेबद्दल आणि घटनात्मकतेबद्दल शंका व्यक्त केल्या. मतदानात सहभाग अनिवार्य करण्यातील व्यावहारिक अडचणींवर त्यांनी भर दिला आणि नमूद केले की, विविध सामाजिक-आर्थिक परिस्थिती असलेल्या देशात अशी सक्ती करणे अवास्तव ठरेल. हा मुद्दा स्पष्ट करताना, न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, अगदी न्यायव्यवस्थेतील सदस्यांनाही (न्यायाधीशांनाही) प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. जर ही मागणी मान्य केली, तर माझे सहकारी न्यायमूर्ती बागची यांना पश्चिम बंगालला जाऊन मतदान करावे लागेल, जरी तो कामकाजाचा दिवस असला तरी, असे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी म्हटले. मतदान न करण्याचा निर्णय घेणाऱ्यांवर दंड लादण्याच्या संभाव्य परिणामांबद्दलही खंडपीठाने प्रश्न उपस्थित केले. मतदानासाठी केवळ जनजागृतीची गरज आहे. पण आपण सक्ती करू शकत नाही, असे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नमूद केले. जर एखादी गरीब व्यक्ती म्हणाली की, 'मला माझ्या रोजगारासाठी (मजुरीसाठी) काम करावे लागेल, मग मी मतदान कसे करू?', तर आपण त्याला काय उत्तर द्यावे? असा सवाल सरन्यायाधीशांनी केला.

---------

### जालना मर्चंट बँकेला २३

भोकरदन शाखा, अंबड शाखा, देऊळगाव राजा, गेवराई शाखा, मंठा शाखा, या शाखेतील मालधारक यांनी त्यांचा शेतमाल पंचमुखी वेअर हाऊस प्रो रायचंद सखाराम कुंरगळ ए.पी.एम.सी. न्यु मार्केट यार्ड ग्रो, प्रोसींग झोन प्लॉट क्रं. ३ सर्वे नं. १८१ जालना यांचेकडे नियमा प्रमाणे जमा केला असल्याच्या पावत्या पंचमुखी वेअर हाऊसचे प्रो.प्रा. कुंरगळ यांनी दिल्यामुळे त्या आधारे जालना मर्चंट बॅकेने १७७ कर्ज मालधारकाना कर्ज दिलेले आहे. त्यापैकी १३३ खातेदार यांनी कर्ज न भरता थकबाकीदार झालेले आहेत. त्यांना बॅकेने वेळोवेळी नोटीस देवुन त्यांचेकडे असलेल्या कर्जाची परतफेड करण्या बाबत वारंवार सांगीतले मात्र ते कर्ज भरत नसल्याने बॅकेने बॅकेच्या नियमा प्रमाणे संबधीत मालधारक कर्जदार यांचे मालाचा लिलाव करण्यासाठी प्रक्रीया केली जाते. बॅकेच्या नियमा प्रमाणे संबंधीत कर्जदार यांचे मालाचा लिलाव प्रक्रिया सुरू केली असता संबधीत मालधारक कर्जदार आणी पंचमुखी वेअर हाऊस चे प्रो.प्रा. रायचंद सखाराम कुंरगळ यांनी अडथळा करुन लिलाव होवु दिला नाही. बँकेने पंचमुखी वेअर हाऊस येथे जावुन मालधारक कर्जधारकांच्या मालाची पाहणी करण्या करीता वेअर हाऊसचे मालक रायचंद सखाराम कुरंगळ यांना स्वत: भेटुन संबधीत थकबाकीदार कर्जधारकांचा जमा माल पाहणी करणे आहे. तो माल दाखवा असे म्हणाल्याने त्यांनी आज नाही नंतर दाखवतो असे म्हणुन दोन महीन्या पासुन मालधारक कर्जधारकांचा जमा असलेला तारण माल दाखविण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे संबधीत कर्जदार यांचा माल गोडावुनमध्ये नसल्याचे समजले. त्यावरुन बॅकेचे महाव्यवस्थापक यांनी दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस पोलीस ठाणे चंदनझीरा गु.र.नं. २२०/२०२६ कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२),३(५) इछ्ड २०२३ प्रमाणे २३ कोटी ३३ लाख रुपयांचा अपहार केल्याबाबत गुन्हा दाखल झाला असुन सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब जालना यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा जालना मार्फत चालु आहे. गुन्हयाचे गांभीर्य पाहुन गुन्हयातील आरोपीचा शोध घेऊन तात्काळ अटक करण्या संबंधी मा. पोलीस अधिक्षक यांचे आदेश असल्याने गुन्हयातील आरोपीचा शोध घेत गोपणीय माहीती अधारे काल रात्री उशीराने आरोपी नामे रायचंद सखाराम कुरंगळ, रा.सिंदखेड राजा ता सिंदखेड राजा जि.बुलढाणा, ह.मु. चौधरीनगर मंठा रोड जालना. हा जालना येथुन फरार झाल्याची माहिती मिळताच वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ आर्थिक गुन्हे शाखेचे पथक जालना येथुन निघुन आरोपीचा त्रांत्रीक विश्लेषणा आधारे पाठलाग करत आरोपी हा पोलीस ठाणे श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर हद्दीमध्ये असल्याची खात्री झाल्याने आरोपीस श्रीगोंदा येथुन ताब्यात घेऊन गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आज रोजी नमुद आरोपीस मा. न्यायालया समोर हजर करण्यात आले मा.न्यायालयाने दोन्ही पक्षाची बाजु ऐकुण घेतल्यानंतर आरोपीची ८ दिवसाची पिसीआर मंजुर केली आहे. गुन्हयाचा सखोल तपास चालु असुन यामध्ये ज्या अरोपीचा सहभाग आहे त्याचा पोलीस शोध घेत आहेत. सदर कामगीरी ही मा. श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक , .सुरेश उनवणे प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा , यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिथुन घुगे सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा , शैलेश म्हस्के, पोलीस उप निरीक्षक, आणि पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

---------------

### जी.श्रीकांत छ.संभाजीनगरचे

संचालकपदी वर्णी लागली आहे. तातडीने पदभार स्वीकारण्याचे आदेश: सहसचिव सुभाष उमराणीकर यांच्या स्वाक्षरीने निघालेल्या या आदेशानुसार, जी. श्रीकांत यांनी आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार गंगाथरण डी. यांच्याकडे सोपवून, छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तपदाचा पदभा र त्वरित स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बदल्यांमुळे छत्रपती संभाजीनगर विभागाच्या प्रशासकीय कामकाजाला नवी गती मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. विशेष म्हणजे, रिक्त होणाऱ्या 'जल जीवन मिशन' सारख्या महत्त्वाच्या प्रकल्पाची धुरा आता गंगाथरण डी. सांभाळतील.

----------

### राज्य शिक्षण विभागातील ११

जि.प. लातूर., सुशील अरविंदराव फुलारी: उपशिक्षणाधिकारी, जि.प. लातूर., सुनीलकुमार सत्यनारायण तोष्णीवाल: गटशिक्षणाधिकारी, पं.स. मानवत, जि.प. परभणी., विठ्ठल बाबुराव घुगे: गटशिक्षणाधिकारी, पं.स. शिरपूर, जि.प. धुळे., गणराज चिंतामण यरमळ: शिक्षण उपनिरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई. ,जमीर जहुरोद्दिन शेख: अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक), पुणे ग्रामीण., श्रीकृष्ण रामराव सपकाळ: गटशिक्षणाधिकारी, पं.स. देऊळगाव राजा, जि.प. बुलढाणा., चतुर साहेबराव पाटील: उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. पालघर., गजानन प्रभाकरराव मंदाडे: उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. गोंदिया., केशव शिवाजी जाधव: गटशिक्षणाधिकारी, पं.स. आर्वी, जि.प. वर्धा. या नियुक्त्या निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाच्या असून, सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील. संबंधित अधिकाऱ्यांना आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या नवीन पदावर रुजू होणे बंधनकारक आहे. तसेच, ज्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगविषयक कारवाई सुरू आहे किंवा फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे, अशांना पदस्थापना देऊ नये, असे निर्देशही शासनाने दिले आहेत. संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यमुक्त करावे, जेणेकरून ते नवीन ठिकाणी रुजू होऊ शकतील.

------------

### खरीप हंगाम धोक्यात...!

याबाबत अनिश्चितता कायम आहे. एकूणच, यंदाचा खरीप हंगाम हा पावसावर आणि जागतिक परिस्थितीवर अवलंबून राहणार असून, शेतकरी आणि अर्थव्यवस्थेसाठी मोठी कसोटी ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि.१७ एप्रिल २०२६



## थोडक्यात



बीड : बीड जिल्हा न्यायालयाच्या आदेशाने ड. उषा आंधळे यांची बीड जिल्हा वकील संघटनेत महिला प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हा न्यायालयात उपकोषागार अधिकारी रामहरी खाडे यांच्या हस्ते त्यांचा शाल,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे, उषा मुंडे, ज्योती मुंडे व ड. प्रभाकर आंधळे उपस्थित होते.

### सीबीएसई बोर्ड परीक्षेत संस्कृती काकडेचे यश

वडवणी । प्रतिनिधी

संस्कृती श्रीनिवास काकडे इयत्ता दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेत यश संपादित केले असून विशेष प्राविण्यासह ती उत्तीर्ण झाले आहे. तिच्या यशामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील प्राध्यापक श्रीनिवास काकडे यांची मुलगी कुमारी संस्कृती ही लातूर येथील ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूल या विद्यालयात शिक्षण घेत आहे. या विद्यालयातून सीबीएसई बोर्डाच्या माध्यमातून तिने इयत्ता दहावीची परीक्षा दिली होती. नुकताच दहावी परीक्षेचा निकाल हाती आला असून ८० टक्के घेऊन विशेष प्राविण्यसह ती उत्तीर्ण झाली आहे. ग्रामीण भागातून आलेल्या संस्कृतीने ग्लोबल शाळेच्या माध्यमातून आपली चुणूक दाखवून दिली आहे. तिच्या यशस्वी वाटचालीला सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ड राज पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, तालुकाध्यक्ष अशोक निपटे( मराठा योद्धा चित्रपटाचे निर्माते ),अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे वडवणी तालुका कार्याध्यक्ष तेजस शिंदे अशोक फपाळ अनिस तालुकाध्यक्ष वडवणी , डॉ. सोनाजीराव रांजवन विद्यालयाचे प्राचार्य यशवंत भोसले सर, नंदकुमार शिंदे, प्रा. गणेश ठाकूर, मराठवाडा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष हनुमंत गवारे, पत्रकार हनुमंत म्हात्रे,संस्कृतीचे मामा इंजिनीयर संघपाल गायकवाड युनियन बँक शाखाधिकारी मध्य प्रदेश येथील धम्मपाल गायकवाड, आजोबा पाटबंधारे विभागाचे माजी अभियंता रामराव गायकवाड, चुलते तुकाराम काकडे, अनुरत काकडे, गोरख काकडे, माजी प्राचार्य सर्जेराव मस्के, मुख्याध्यापक सुरेश निकाळजे डॉ.अशोक काकडे प्राचार्य विकास निकाळजे यांच्यासह आई सौ. जानका व वडील श्रीनिवास काकडे आदींनी संस्कृतीला मनभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

### ऊसतोडीच्या पैशांवरून पतीचे अपहरण; सिरसदेवी येथील दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

ऊसतोडीसाठी घेतलेल्या ५ लाख रुपयांच्या पैशांवरून पतीचे अपहरण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी शीतल रवींद्र शेंबडे (वय ३४, रा. उमापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दत्ता वेताळ आणि एकनाथ बबन राठोड (दोन्ही रा. सिरसदेवी, ता. गेवराई) यांच्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी शीतल आणि त्यांचे पती रवींद्र शेंबडे हे ५ एप्रिल २०२६ रोजी रात्री १२:३० च्या सुमारास उमापूर ते माटेगाव रोडवरून दुचाकीने जात होते. यावेळी एका चारचाकी सुमो गाडीने त्यांना अडवले. गाडीतून खाली उतरलेल्या दत्ता वेताळ आणि एकनाथ राठोड यांनी ऊसतोडीसाठी दिलेले ५ लाख रुपये कधी देणार? असे म्हणत पती रवींद्र यांना बळजबरीने गाडीत डांबून अपहरण केले. शीतल यांनी विनंती करूनही आरोपींनी शिवीगाळ केली आणि त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, गेवराई पोलीस अधिक तपास करत आहेत. आरोपींच्या शोधासाठी पोलीस पथक रवाना झाले आहे.

# नवगण राजुरीत एलसीबीचा छापा अडीच लाखांचा गुटखा पकडला

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्यांविरुद्ध बीड पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने नवगण राजुरी येथील एका दुकान गाळ्यावर छापा टाकून सुमारे २,४५,३२८/- रुपये किमतीचा अवैध गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



आज दि. १६ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नवगण राजुरी परिसरात अवैध धंद्यांच्या प्रतिबंधासाठी पेट्रोलिंग करत होते. यावेळी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांना गुप्त बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली. नवगण राजुरी येथील सरकारी दवाखान्यासमोर असलेल्या एका दुकान गाळ्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विविध कंपन्यांचा गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांची कारवाई मिळालेल्या माहितीची खातरजमा करून, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशाने पथकाने सकाळी १०.१५ वाजेच्या सुमारास संबंधित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत विकास महादेव टुले (वय ३० वर्षे, रा. नवगण राजुरी, ता.जि. बीड) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातील गाळ्यातून वेगवेगळ्या कंपन्यांचा एकूण २,४५,३२८/- रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

आरोपी विकास महादेव टुले याच्याविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोउपनि श्रीराम खटावकर, राहुल शिंदे, गोविंद राख, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, मनोज परजणे, अशफाक सय्यद आणि नितीन वडमारे यांचा समावेश होता.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त 'समता ज्योत रॅली' उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात पोलीस प्रशासन आणि समस्त शिव-फुले-शाहू-आंबेडकर अनुयायी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'समता ज्योत रॅली' अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

संविधानाद्वारे समतेची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आणि समाजात समता, बंधुता व सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार, १३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११:३० वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या भव्य रॅलीला सुरुवात झाली.




हातात समतेची ज्योत घेऊन निघालेली ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन पुढे शहरातील प्रमुख मार्गावरून जात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भिमनगर येथे पोहोचली. येथे ठिक १२ वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरा सह जनतेने अभिवादन केले व बुद्ध वंदनेने ह्या रॅली ची सांगता करण्यात आली. रॅली मध्ये बाबासाहेबांच्या विचारांचे फलक व निळे ध्वज दिसुन आले, ज्यामुळे संपूर्ण शहर चैतन्यमय झाले होते.

या समता ज्योत रॅली साठी मा.गौरव इंगोले उपविभागीय अधिकारी माजलगाव, मा.राहुल सुर्यतळ पोलीस निरीक्षक, माजलगाव यांच्या सह सर्व धर्मीय नेते, प्रतिष्ठीत नागरिक, नगरसेवक, व्यापारी, सर्व सामान्य नागरिक युवक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते महिला व युवतींचा मोठा सहभाग पहायला मिळला. माजलगाव शहर व ग्रामीण परिसरातील समस्त शिव-फुले-शाहू-आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान जय भीम च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे रॅली अत्यंत शांततेत आणि शिस्तीत पार पडली. आयोजकांनी या कार्यक्रमाच्या यशाबद्दल सर्व सहभागी नागरिकांचे आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## पान ६ वरुन...

### आ. सुरेश धस यांच्या हस्ते

संदेश देण्यात आला. बैठकीदरम्यान शेतीशी संबंधित विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बियाणे, खते, औषधे यांची वेळेत उपलब्धता, वीजपुरवठा, सिंचन व्यवस्थापन, तसेच अनुदान प्रक्रियेतील अडथळे या विषयांवर शेतकऱ्यांनी आपली मते स्पष्टपणे मांडली. काही शेतकऱ्यांनी उद्दढ प्रक्रियेतील विलंब, कागदपत्रांची अडचण तसेच तांत्रिक त्रुटींबाबतही प्रशासनाचे लक्ष वेधले. यावर प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत तात्काळ तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. खरीप हंगाम कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने काम करतील, असे स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय महसूल अधिकारी कविता जाधव व वसीमा शेख, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, शेळके साहेब, गांगर्डे साहेब, कृषी विस्तार अधिकारी, कृषी सेवा केंद्रांचे विक्रेते तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. एकूणच, या बैठकीमुळे आष्टी तालुक्यातील शेती व्यवस्थापनाला नवी दिशा मिळणार असून आधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना आणि प्रशासनाच्या समन्वयातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचा मार्ग अधिक मजबूत झाला आहे. आगामी खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे चित्र या बैठकीतून स्पष्ट झाले.

### भाजपचे नगरसेवक पती

देशपांडे कुटुंबियांसह भाजपचे पदाधिकारी पोलीस अधीक्षकांची भेट घेण्यासाठी गेले होते. यावेळी भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, शहराध्यक्ष अशोक लोढा, संपादक दिलीप खिस्ती, ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे, नगरसेवक जगदीश गुरखुदे, शुभम धूत, डॉ.रविंद्र घुंबरे, ॲड. संगीता धसे, ॲड. दीपक कुलकर्णी, प्रमोद पुसरेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. माध्यमांशी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले की, सागर देशपांडे यांच्यावर झालेला हल्ला हा राजकीय वैमनस्यातून झाला आहे. देशपांडे कुटुंबाची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसताना त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेचे स्पष्ट सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असूनही संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब चिंताजनक आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे हा प्रकार निदर्शनास आणून देण्यात आला असून, न्याय मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### रोटी पिंपरीत दिवसाढवळ्या थरार

मोटारसायकलने धडक देऊन खाली पाडून तिचे दागिने लंपास केल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा अशाच स्वरूपाचा प्रकार घडल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या घटनेप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत. नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, परिसरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे पोलीस प्रशासनाने गस्त वाढवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### शेतीसोबत दुधाचा

की, आष्टी दूध संघ मराठवाड्यात दुसऱ्या क्रमांकावर असून, दररोज दीड लाख लिटरपेक्षा अधिक दुध संकलन होत आहे. शेतकऱ्यांनी दर्जेदार दूध उत्पादन केल्यास त्यांना योग्य भाव मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी राजमाता दूध संघाचे चेअरमन अविनाश जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी तवलवाडीचे सरपंच हिरा भाऊ केरूळकर ह भ प भागचंद झांजे अशोक पोकळे,, पिंटू चेअरमन कोकणे बाळासाहेब पोकळे, यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गाडेवाडीत अंगणवाडी

शुभारंभ विद्यमान सरपंच राजेंद्र कदम यांच्या शुभहस्ते नारळ फोडून करण्यात आला. यावेळी युवा कार्यकर्ते सुदाम लोंढे, माजी उपसरपंच अंबादास गाडे, अशोक करांडे, ग्रामपंचायत सदस्य बाळू पाटील, महादेव गाडे, नारायण गाडे, सुभाष वावरे, श्रीराम वावरे, सातीराम महारगुडे, रमेश गाडे, गणपत वावरे, लाला वावरे, संभाजी गाडे, अशोक गाडे, नवनाथ वावरे, सचिन लवटे, मच्छिंद्र मोरे, भरत गाडे आदींसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. नवीन अंगणवाडी इमारतीमुळे गावातील लहान मुलांना सुरक्षित, स्वच्छ व सुसज्ज वातावरणात शिक्षण घेता येणार असून, त्यांच्या होत असलेल्या गैरसोयीला आता कायमचा पूर्णविराम मिळणार आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी उचललेले हे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात असून, ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### आशय संपन्न साहित्यातुन

नंदकिशोर पाटील, अशोक तांगडे, डॉ. दीपा क्षीरसागर, डॉ. विठ्ठल जाधव, उपस्थीत होते, प्रभाकर साळेगावकर उपस्थीत होते. शेवटी वेदनांनी घायाळ झालेल्या डॉ. जगन्नाथ एस, कांबळे यांच्या कवितांनी ४५ वे मराठवाडा, साहित्य संमेलन मंत्र मुग्ध झाले त्याबद्दल श्री. दत्ता वालेकर मा. बाळासाहेब कांबळे, मा. विठ्ठल जाधव, मा. अनिल ससाणे, मा. अनंत कराड यांनी हार्दिक शुभेच्छा व्यक्तकेल्या शेवटीस्वागताध्यक्ष मा. दिपक नागरगोजे यांनी सर्वांचे आभार मानले

## सक्षम वाघमारे याचे राज्यस्तरीय मंथन परीक्षेत घवघवीत यश, तालुक्यातुन मिळवला दुसरा क्रमांक

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यामध्ये दरवर्षी होत असलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत सक्षम सतीश वाघमारे या विद्यार्थ्याने घवघवीत यश मिळवले असून वडवणी तालुक्यातून दुसरा क्रमांक मिळवत त्याने हे यश संपादन केले आहे. तसेच राज्यातून ४० व्या क्रमांकावर तर बीड जिल्ह्यातुन ३५ व्या क्रमांकाने तो उत्तीर्ण झाला असून त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचं कौतुक होत आहे.



महाराष्ट्र राज्यामध्ये दरवर्षी सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा होत असते,त्याच अनुषंगाने २०२६ या वर्षातही राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. ही परीक्षा संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून घेतली जाते, वर्ग पहिली ते सातवी या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी या परीक्षेचे संपूर्ण राज्यामध्ये आयोजन केलं जातं त्याचा निकाल नुकताच घोषित झाला असून चिखलबीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी चि. सक्षम सतीश वाघमारे इयत्ता ५ वी याने या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून वडवणी तालुक्यातून दुसरा येण्याचा मान त्याने पटकावला आहे तर राज्यातून ४० व्या क्रमांकाने व बीड जिल्ह्यातून ३५ व्या क्रमांकाने त्याने हे यश संपादन केले आहे शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय महत्त्वाची समजल्या जाणाऱ्या व शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने होत असलेले या परीक्षेला राज्यभरातील वर्ग पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा विकास व त्यांच्या मध्ये असलेली गुणवत्ता तपासण्यासाठी ही परीक्षा अतिशय महत्त्वाची समजली जाते


एक फेब्रुवारी २०२६ मध्ये सदरची परीक्षा राज्यामध्ये घेण्यात आली होती या परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन पध्दतीने जाहीर झाला आहे. यामधये चिखलबीड जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी सक्षम सतीश वाघमारे याने हे यश संपादन केले आहे. त्याला शाळेचे सर्व शिक्षक, त्याचबरोबर राजमाता मार्गदर्शन केंद्र येथील श्री मध्येवाड सर, श्री पवन आरसेवार सर, तसेच खांडवे कोचिंग क्लासेसचे श्री. खांडवे सर यांचं उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले असून या सर्वांच्या अथक परिश्रम मार्गदर्शनामुळे व स्वतःच्या कुशाग्र बुध्दीमत्तेच्या बळावर त्याने हे यश संपादन केले असून त्याच्या यशाबध्दल शाळेतील सर्व गुरुजन वर्ग तसेच वडवणी तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रासह, शिक्षणक्षेत्र व सर्वच क्षेत्रातील त्यांचे स्नेहीजन हितचिंतक यांनी चि.सक्षम ला अभिनंदन करुन त्याला त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## युग प्रवर्तक चषक २०२६: आय के एन संघाची दमदार कामगिरी; उपविजेतेपद पटकावले

माजलगाव । प्रतिनिधी

दर वर्षी प्रमाणे याहीवर्षी युग प्रवर्तक चषक २०२६ अंतर्गत आयोजित शिक्षक व इतर कर्मचारी क्रिकेट स्पर्धेत आयकेएन संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेत विविध संघांमध्ये रंगतदार सामने पाहायला मिळाले.

आय के एन संघाचे संघमालक इमरान नाईक व कर्णधार शेख सलीम यांनी संघाचे नेतृत्व समर्थपणे सांभाळले. संघातील खेळाडूंनी एकजुटीने खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. विशेषतः ओंकार थेटे याने संपूर्ण मालिकेत दमदार कामगिरी करत मॅन ऑफ द सिरीज पुरस्कारावर



आपले नाव कोरले.तसेच उपकर्णधार अब्दुल सर, मार्गदर्शक रिजवान सर, असद सर, युसुफ सर, मुजम्मील सर , जकी, विशाल मते, अन्सार भाई, डॉ.राठोड, चव्हाण सर,पवार सर,यांचेही संघाच्या यशात मोलाचे योगदान राहिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संघाने स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

या यशानंतर आय के एन संघावर सर्व क्रीडाप्रेमी, शिक्षकवर्ग आणि विविध स्तरातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या कामगिरीमुळे माजलगावच्या क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## बीड सांगवी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बीड सांगवी येथे कार्यालयात विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे बीड सांगवी गाव महापुरुष विचारा वारसा जपणारा गाव आहे प्रत्येक समाजातील गुण्यागोविंदाने महापुरुषांच्या जयंती उत्साहात साजरा करण्यात येत असतो यावेळी माजी उपसरपंच जेष्ठ रंजित ढोबळे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आहे मोठा थाटामाटणे जयंती साजरी केली आहे .



हावेळी प्रथम नागरिक नंदकिशोर करांडे, सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे, बबनराव करांडे भाजपा उपाध्यक्ष,आ सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहायक विकास तात्या साळवे, जेष्ठ नागरिक मल्हारी आणा करांडे, विजय करांडे, संतोष नरवडे,विजय कणसे, सतिश कणसे,फकड नरवडे, शरद नरवडे ग्रामपंचायत सदस्य, संतोष आंबा नरवडे, भाऊसाहेब पानतावणे, दादा मस्के, रामभाऊ करांडे, जालीधर देवकर,किरण पारीख दिपक कासवा, राजाभाऊ चव्हाण, बाळासाहेब काका करांडे, गोरख देवकर, पप्पु ढोबळे, महादेव करांडे, महादेव चव्हाण कृष्णा पाणतावणे, कल्याण मोहोरकर ,बारकु ढोबळे,चदु नरवडे,आदि उपस्थित होते व भिमनगर चौकात मध्ये भाजपाचे उपाध्यक्ष बबनराव करांडे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आहे तर ललेश शेठ नरवडे यांनी गौतम बुद्धाच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले तर भिमसौनिक अभिवादन करून मोठ्या थाटामाटाने जयंती साजरी केली आहे यावेळी संतोष शेठ नरवडे, सोमनाथ नरवडे, सामाजिक कार्यकर्ते विजय डुकरे दादा साळवे उपसरपंच, सोमनाथ घुले, गोकुळ नरवडे, विजय साळवे,विजय कणसे, सोमनाथ करडुळे,रियाज शेख, प्रशांत घुमरे, गणेश नरवडे, संजय बावणे विठ्ठल कणसे दता नरवडे,भरत आगवान, राजेंद्र नरवडे, गौतम नरवडे,जाफर शेख, मच्छिंद्रनाथ दिवटे, अशोक जाधव, रोहीदास मस्के, धनंजय टोणपे, नवनाथ मस्के, अशोक साळवे, ऋषिकेश साळवे,प्रतिक साळवे,चिखया मस्के, संदिप साळवे, रविराज साळवे,वौभव मस्के,बाळु मस्के जगन्नाथ मस्के गहीनाथ म्हस्के संजय डुकरे, मिलिंद साळवे संजय मस्के,,आदी भिमसौनिक उपस्थित होते यावेळी सगळे आभार धन्यवाद विकास तात्या साळवे मानलें.

### जाहीर प्रगटन

कार्यालय नगर परिषद घनसावंगी जि.जालना
प्रशासकीय इमारत, घनसावंगी
npghansawangigmail.com
PHno02483-271787

जा.क्र.२०२६/नपघ/जा.प्र./कावी- ६१) दिनांक:-१६/०४/२०२६

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शिवप्रसाद भगवानदास चांडक रा. कुंभार पिंपळगांव ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे १. शेख वलीयोद्दीन नसीरोद्दीन २. शेख मुमताज फहीमोद्दीन रा.ता.बीड जि. बीड यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १८६६ दि. ३०/०५/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. १४४ दिनांक: १६/०४/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. शेख वलीयोद्दीन नसीरोद्दीन २. शेख मुमताज फहीमोद्दीन रा.ता.बीड जि.बीड नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ४८ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १७०५/४८ मधील क्षेत्र ८८.४१५ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- उमेश देशमुख यांची जमीन
पश्चिमेस ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिणेस : प्लॉट नं. ४९
उत्तरेस :- प्लॉट नं. ४७

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र ८८.४१५ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६
४

# कोरडवाहू शेतीत चिंच लागवड : शेतकऱ्यासाठी उत्पन्नाचा राजमार्ग

जर आपण चिंच लागवडीचा विचार केला तर हव्या त्या प्रमाणात चिंचेचे लागवड क्षेत्र नाही. परंतु कोरडवाहू शेतीसाठी चिंच लागवड एक वरदान ठरू शकते. चिंच लागवडीत जास्त काही व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करण्याची गरज नसून, एक जमिनीची निवड आणि चिंचेच्या प्रमुख जाती इत्यादी गोष्टी माहित असणे आवश्यक आहे. चिंचेची लागवड पद्धत आणि खत व्यवस्थापन यावर विशेष लक्ष दिले तर चिंच लागवड एक वरदान ठरू शकते.

चिंचेची लागवड : जर चिंचेचे रोप किंवा कलम यांचे लागवड करायची असेल तर त्यासाठी एक बाय एक बाय एक मीटर आकाराचे खड्डे खोदून घ्यावेत. ज्या वेळेस तुम्ही एकटे भराल त्यावेळी खड्ड्याच्या तळाशी दहा ते पंधरा सेंटीमीटर उंचीपर्यंत पालापाचोळा टाकावा व त्यानंतर चांगले कुजलेले शेणखत अंदाजे पंधरा किलो, नत्र, स्फुरद आणि पालाश या मुख्य अन्नद्रव्ये यांचे मिश्रण शंभर ग्रॅम आणि २०० ग्रॅम निंबोळी आणि माती यांचे मिश्रण करून खड्डे भरावेत. खड्डे भरताना मातीत १०० ग्रॅम कीडनाशक पावडर मिसळली तर फायद्याचे ठरते. एक दोन चांगले पाऊस पडल्यानंतर रोप किंवा कलमांची मुख्य शेतात लागवड करावी. त्यामुळे पावसाळी दमट हवामानाचा झाडाच्या वाढीसाठी भरपूर फायदा होतो. झाडाचे मर कमी होते व झाडाची वाढ जोमदार होते. उन्हाळ्यामध्ये आवश्यक ओलावा टिकून राहावा यासाठी हा यामध्ये वाळलेले गवत, पाचटाचे आच्छादन किंवा भुसा वगैरे यांचा वापर फायद्याचा ठरतो. चिंचेच्या झाडाची वाळवी किंवा मूळकूज इत्यादीपासून बचाव करण्यासाठी शिफारसीत बुरशीनाशक व कीटकनाशकांचे आळवणी प्रत्येक रोपाच्या आळ्यात करावी.




योग्य काळजी घेतल्यास भरपूर उत्पादन : चिंचेच्या झाडाला वळण देणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठी जेव्हा झाड एक मीटर उंचीची होईल तेव्हा त्याचा शेंडा खुडावा. कारण यामुळे चारी दिशांना चिंचेच्या फांद्यांची वाढ होते व आकार देखील डेरेदार होतो. चिंचेच्या झाडाची इतर फळबाग प्रमाणे नियमित छाटणी करण्याची आवश्यकता नाही. आत्ता जेव्हा तुम्ही दरवर्षी चिंचा तोडल्यानंतर झाडावर जे काही वाळलेल्या फांद्या असतात त्या कापून काढाव्यात.

जेव्हा चिंच काढणी पूर्ण झाल्यानंतर बागेला पाण्याचा चांगला ताण द्यावा. यामुळे फुलधारणा जास्त प्रमाणात होते व फुलांचे रूपांतर फळांमध्ये झाल्यानंतर पाणी द्यावे. बऱ्याच कृषी तज्ञांच्या मतानुसार जर विचार केला तर, चिंचेचे फळ काढताना किंवा फळे काढल्यानंतर बांबूच्या काठीने चिंचेची झोडपणी केली तर पुढे येणाऱ्या काळात चिंचेच्या झाडाला फुले व फळे मोठ्या प्रमाणात येतात.

# नवनवीन पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला

शेतकरी आता शेतीची परंपरागत पिके देण्याचे सोडून नवनवीन पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. बरेच शेतकरी वेगवेगळ्या पद्धतीचे पिके घेत असून, फळबाग लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल सध्या भरपूर प्रमाणात वाढला आहे. फळबागांचा जर आपण विचार केला तर आपल्याकडील शेतकरी फळबागांमध्ये विविध फळझाडांची लागवड करतात. त्यामध्ये प्रामुख्याने डाळिंब,द्राक्ष,पेरू, आंबा, सिताफळ इत्यादी भरपूरफळांची नावे सांगता येतील. या फळ लागवडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्पन्न देखील चांगले मिळत आहे. अननस खाण्याचे अनेक फायदे आहेत. भुक वाढवण्यासाठी आणि पोटाशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यासाठी हे उपयुक्त आहे. त्यामुळे बाजारात चांगला भाव मिळतो. सध्या फारच लोक अननसाची लागवड करतात, परंतु तुम्ही त्याच्या लागवडीतून चांगला नफा मिळवू शकता. अनेक राज्यांमध्ये १२ महिने अननसाची लागवड केली जाते. अननस लागवडीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ती वर्षातून अनेक वेळा करता येते.



अधिक नफा मिळविण्याची संधी : इतर पिकांच्या तुलनेत अननसात नफा मिळविण्याच्या चांगल्या संधी आहेत. अननस हा उष्ण हवामानाचा क्षण मानला जातो. मात्र वर्षभर त्याची लागवड करता येते.

अननस लागवड :अननस ही एक कॅक्टस प्रजाती आहे. त्याची देखभाल देखील खूप सोपी आहे. या सोबतच हवामानाचे फारशी काळजी घेण्याची गरज नाही. केरळ सारख्या अनेक राज्यांमध्ये शेतकरी केवळ १२ महिनेच लागवड करतात. याच्या झाडांना इतर झाडांच्या तुलनेत कमी सिंचन लागते. पेरणीपूर्वी फळे पिकण्यापर्यंत १८ ते २० महिने लागतात. फळ पिकल्यावर त्याचा रंग लाल पिवळा होऊ लागतो. त्यानंतर त्याच्या काढणीचे काम सुरू होते.

असा होतो नफा :अननसाच्या झाडांना एकदाच फळ येते. म्हणजेच तुम्हाला अननस फक्त एकदाच भरपूर मिळू शकते. यानंतर दुसऱ्या लॉटसाठी पुन्हा पीक घ्याव लागते. अननस अनेक रोगांवर खाल्लं जातं. त्यामुळे बाजारात त्याची मागणी जास्त आहे. हे फळ बाजारात सुमारे १५० ते २०० रुपये किलो दराने विकले जाते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी एकरी ३० टन अननसाचे उत्पादन घेतल्यास लाखो रुपयांचे उत्पन्न मिळू शकते.

# साठवलेल्या गव्हाला कीड लागू नये यासाठी प्रभावी उपाय

साठवणूकीच्या काळात गव्हामध्ये किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी त्यात ओलाव्याचे प्रमाण दहा टक्क्यांपेक्षा कमी ठेवावे. त्यासाठी मळणीनंतर गव्हास तीन ते चार दिवस चांगले ऊन द्यावे. त्यानंतर गहू थंड होऊ द्यावा. त्यानंतर साठवण करावी.


शिफारस केलेल्या रसायनांचा तज्ज्ञांच्या सल्ल्याने बंद कोठीत वापर करावा. गहू साठविण्यासाठी ओलावा, उंदीर, पक्षी आणि अस्वच्छतेपासून मुक्त अशा सुरक्षित जागेची निवड करावी. गहू साठवण्यासाठी धातूच्या पत्र्यापासून अथवा सिमेंटपासून बनवलेल्या सुधारित कोठीचा वापर करावा. पोती स्वच्छ साफ करूनच त्यात धान्य भरावे. पोती लाकडी फळया अथवा पॉलिथीनच्या शीटवर ठेवावीत.

कीडपासून वाचवण्याचे प्रभावी उपाय :

कडक ऊन - गहू साठवण्यापूर्वी तो कडक उन्हात वाळवून त्यातील आर्द्रता कमी करा. कडुलिंबाचा पाला - वाळलेल्या कडुलिंबाची पाने गव्हाच्या डब्यात टाकल्याने कीड दूर राहते. हिंग/लवंग - हिंगाची पुरचुंडी किंवा लवंग डब्यात ठेवल्यास त्यांच्या तीव्र वासामुळे कीटक येत नाहीत. एरंडीचे तेल - काही लोक गव्हाला एरंडीचे तेल लावून साठवतात, ज्यामुळे कीड लागत नाही. हवा-बंद साठवणूक - गहू हवाबंद डब्यात (मेटल कंटेनर सर्वोत्तम) साठवावा. सुरक्षित जागा - गहू ओलावा नसलेल्या, कोरड्या जागी साठवावा.

कीड लागली असल्यास उपाय :

जर गव्हाला कीड लागली असेल, तर तो उन्हात वाळवून, चाळून पुन्हा साठवावा किंवा बोरिक पावडरचा वापर करावा.



# प्रतिकूल परिस्थितीतही तग धरणाऱ्या 'कारळा' पिकाचे लागवड तंत्रज्ञान

खरीपात काही पिकांचे अति पावसामुळे नुकसान होते तर काही पिके तग धरून राहतात. असेच एक पीक म्हणजे कारळा. हे दुर्लक्षित केलेले पण महत्त्वाचे पारंपरिक खरीप तेलबिया पीक आहे. त्यामध्ये ३५ ते ४० टक्के तेल असते. वेगवेगळ्या प्रकारे उपयुक्त असणारे हे कारळ्याचे पीक शेतकऱ्यांनी मात्र पूर्णपणे दुर्लक्षित केले आहे.

कारळ्याचे उपयोग :कारळ्याच्या तेलाचा वापर खाद्यतेल म्हणून केला जातो. याशिवाय या तेलाचा वापर रंग, साबण, यंत्रात लागणारे वंगण आणि सौंदर्य प्रसाधने तयार करण्यासाठी केला जातो. कारळ्याच्या पेडींचा वापर जनावरांना खाद्यपेंड म्हणून करतात. विशेषतः दुभत्या जनावरांसाठी या पेंडीचा वापर केला जातो. कारण या पेंडीमध्ये ३७ टक्के प्रथिने, २६ टक्के कर्बोदके आणि ४.५८ टक्के खनिजे असतात. तसेच या पेंडीचा वापर सेंद्रिय खत म्हणूनही केला जातो. या पेंडीमध्ये ५ टक्के नत्र, २ टक्के स्फुरद, व १.५ टक्के पालाश असते. कारळा बी स्वादिष्ट चटण्या आणि खमंग मसाल्यामध्ये वापरण्यात येते. बहुपीक पद्धतीमध्ये मधमाशा आकर्षित करणारे व किडींना परावृत्त करणारे हे पीक आहे.



कारळा पिकाची लागवड :या पिकाची लागवड मुख्यत्वे करून वरकस उताराच्या आणि साधारण प्रतिच्या जमिनीवर घेतली जाते. विशेषतः खरीप हंगामात कोरडवाहू पीक म्हणून या पिकाचा आजवर विचार केला आहे. पीक वाढीसाठी लागणाऱ्या अन्य घटकांचा किंवा सेंद्रिय खतांचा या पिकासाठी वापर केला जात नाही. हे पीक खूप दाट पेरल्यास खरीप हवामानात उंच वाढते, फांद्या कमी फुटतात. त्यामुळे कारळ्याचे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. कारळा हे पीक खरीप व रब्बी हंगामात घेता येते. जादा पावसात तग धरते शिवाय पाण्याचा ताणही सहन करते. प्रतिकूल परिस्थितीत पिकाची चांगली वाढ होते. जमिनीतील सर्वसाधारण अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यामध्येही पीक उत्तम येते. या पिकामध्ये अवर्षण प्रतिकारक शक्ती असल्यामुळे कमीत कमी पाण्यात या पिकाची चांगली वाढ होते. या पिकास रोग, किडींचा विशेष प्रादुर्भाव होत नाही. उग्र वास असल्यास भटक्या गुरांचा त्रास पण कमी होतो.

उत्पन्न व शेत सुशोभिकरण :कारळ्याची पिवळी फुले २० ते २५ दिवस टिकून राहतात. या गुणधर्माचा वापर करून शेतजमीन सुशोभित करण्यासाठी या पिकाची लागवड उत्तम ठरते. तृणधान्ये, भाजीपाला पिकांमध्ये आंतरपीक म्हणून या पिकाची लागवड करणे शक्य आहे. या पिकांच्या भोवती लागवड करावी. पक्ष्यांचा या पिकास बिलकूल त्रास होत नाही. या पिकाची फूलधारणा झाल्यावर आकर्षित होतात. त्यामुळे शेतातील इतर परपरागसिंचित पिकांमध्ये परागीभवन जास्त प्रमाणात होते. पिकाची फुले सुकून बोंडे काळी झाली की, कापणी करावी.




## महत्वाच्या घटना

१९३५ : सन म्युंग मूनला येशू ख्रिस्ताने स्वप्नात साक्षात्कार दिला व आपण सुरु केलेले कार्य पुढे नेण्याची आज्ञा केली.
१९४१ : दुसरे महायुद्ध युगोस्लाव्हियाने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४६ : सिरीयाने फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळवले.
१९५० : बॅ. मुकुंदराव जयकर पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाले.
१९५२ : पहिली लोकसभा अस्तित्त्वात आली.
१९७० : चांद्रयान अपोलो १३तील अंतराळवीर सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले.
१९७१ : द पीपल्स रिपब्लिक ऑफ बांग्लादेशची स्थापना झाली.
१९७५ : ख्मेर रुजने कंबोडियाची राजधानी नॉम पेन्ह जिंकली.
१९८० : 'अपोलो-१३' हे अंतराळयान चांद्रमोहीम अर्ध्यावर सोडून सुखरुप पृथ्वीवर परतले.
१९८३ : भारतीय अवकाश संशोधन संस्थेने उपग्रह प्रक्षेपण वाहन(रॉकेट) 'एसएलव्ही३' चे प्रक्षेपण केले.
१९९३ : एसटीएस-५४ हे संशोधक अंतराळयान सुखरूप पृथ्वीवर परतले.
२००१ : अफवांच्या अर्थशास्त्राचा सिद्धांत मांडणारे मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मधील अर्थशास्त्रज्ञ प्रा. अभिजित बॅनर्जी यांना पहिला 'माल्कम आदिशेषय्या पुरस्कार' जाहीर

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७९ : कवी सूरदास, हिंदीतील एक थोर कवी व श्रेष्ठ कृष्ण भक्त.
१८२० : बेसबॉल चे जनक अलेक्झांडर कार्टराईट यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै १८९२)
१८३७ : जे. पी. मॉर्गन अमेरिकन सावकार (मृत्यू: ३१ मार्च १९१३)
१८९१ : यशवंत रामकृष्ण दाते कोशकार. चिं. ग. कर्वे यांच्या साहाय्याने त्यांनी 'महाराष्ट्र मंडळ कोश' स्थापन करून आठ खंडांचा 'महाराष्ट्र शब्दकोश' तयार केला. (मृत्यू: २१ मार्च १९७३)
१८९७ : निसर्गदत्त महाराज अद्वैत तत्त्वज्ञानी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९८१)
१९१२ : भारतीय कादंबरीकार आणि मल्याळम साहित्याचे लघुकथा लेखक थकाझी शिवसंकरा पिल्लई यांचा जन्मदिन.
१९१६ : सिरीमाओ बंदरनायके श्रीलंकेच्या ६ व्या व जगातील पहिल्या महिला पंतप्रधान. त्यांचे पती श्रीलंकेचे व दुसरे पंतप्रधान सॉलोमन बंदरनायके यांच्या हत्येनंतर त्या पंतप्रधान झाल्या. त्यांनीच देशाचे 'सिलोन' हे नाव बदलून 'श्रीलंका' केले. खाजगी शाळा, तेलमंपन्या रबराचे मळे व चहाचे मळे यांचे त्यांनी राष्ट्रीयीकरण केले. (मृत्यू: १० आक्टोबर २०००)
१९४३ : भारतीय इतिहासकार व प्राध्यापक डॉ. एन. एन. नामपोथीरी यांचा जन्मदिन.
१९५१ : बिंदू चित्रपट अभिनेत्री
१९६१ : गीत सेठी बिलीयर्डसपटू
१९७२ : मुथैय्या मुरलीधरन श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९७७ : दिनेश मोंगिया क्रिकेटपटू

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९० : बेंजामिन फ्रँकलिन, विजेच्या शक्तीविषयी महत्त्वाचा शोध लावणारे अमेरिकेतील थोर शास्त्रज्ञ.
१८८२ : फ्लश टॉयलेट चे शोधक जॉर्ज जेनिंग्स यांचे निधन. (जन्म: १० नोव्हेंबर १८१०)
१९४६ : व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री कायदेतज्ज्ञ, सूक्ष्मबुद्धीचे राजकारणी, भारत सेवक समाजाचे अध्यक्ष आणि इंग्रजी वक्ते (जन्म: २२ सप्टेंबर १८६९)
१९७५ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ५ सप्टेंबर १८८८)
१९९७ : बिजू पटनायक ओरिसाचे मुख्यमंत्री, केन्द्रीय पोलाद, खाणकाम आणि कोळसा मंत्री (जन्म: ५ मार्च १९१६)
१९९८ : चित्रपट निर्माते विजय सिप्पी (वय ५५) यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू (जन्म:)
२००१ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (जन्म: १९ आक्टोबर १९२५)
२००४ : सौंदर्या कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि हिन्दी चित्रपट अभिनेत्री (जन्म: १८ जुलै १९७२)
२००५ : भारतीय राज्य उत्तरप्रदेश आणि हिमाचल प्रदेशाचे माजी राज्यपाल विष्णू शास्त्री यांचे निधन.
२०११ : विनायक आदिनाथ तथा 'वि. आ.' बुवा विनोदी साहित्यिक (जन्म: ४ जुलै १९२६)
२०१२ : वसंत दिवाणजी, कन्नड साहित्यात मौल्यवान योगदान देणारे प्रतिभावंत लेखक.



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत



# सखी वन स्टॉप सेंटर म्हणजे पीडित महिलांच्या हक्काचा आधारवड-जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी

समाजातील पीडित असलेल्या महिलांच्या पाठीशी उभे राहत लढा देवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य सखी वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून केले जात आहे. त्यामुळे पीडित महिलांसाठी हे केंद्र हक्काचे आधारवड ठरत आहे. याठिकाणी एकाच छताखाली सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यात आहेत. जालना जिल्ह्यात जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात (घाटी) सखी वन स्टॉप सेंटर जुन २०१९ पासून कार्यान्वित आहे. केंद्राचा संपर्क क्रमांक ९४२२२६१५१६ असा असून एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर मदत, समुपदेशन, गरज असल्यास आश्रयाची सोयही उपलब्ध करू दिली जाते. त्यामुळे समाजातील पीडित महिलांना न्याय मिळवून



देण्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

महिला व बालविकास मंत्रालयाकडून ते चालवले जाते. शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ, कौटुंबिक छळ, ॲसिड हल्ला किंवा सायबर क्राईममधील अत्याचारास बळी पडलेल्या महिलांना पोलिस, वकील, समुपदेशक अशा अनेकांची मदत घ्यावी लागते. अशावेळी सखी वन स्टॉप सेंटर पीडितेच्या पाठीशी उभे राहून लढा देत न्याय मिळवून देत आहे. कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक शोषण, हुंडाबळी, छळ, जाच, ॲसिड हल्ले, आणि बाल लैंगिक शोषणग्रस्त पीडितांना या ठिकाणी मदत केली जाते.

सहा प्रकारची केली जाते मदत :पीडित महिलांना कायदेशीर मदत, पोलिस मदत, समुपदेशन, वैद्यकीय मदत, तात्पुरता निवारा, व्हिडीओ कॉन्फरन्स सुविधा, पोलिस सहाय्यता आदींची मदत देतात. हे कार्यालय २४ तास सुरु असते. त्यासाठी १३ कर्मचारी आहेत. गरजेनुसार त्यांना पाच दिवसाचा तात्पुरता निवारा दिला जातो. सद्यस्थितीत केंद्रामध्ये एकाच वेळी ५ महिला व्यवस्थित राहू शकतील एवढी क्षमता या निवारा गृहाची आहे. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध सेवा :या अडीच वर्षांच्या कालावधीत या सेंटरने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या मदतीने जुन २०१९ ते मार्च २०२६ या कालावधीत आजपर्यंत ८७५ पीडित महिलांच्या विविध समस्यांवर निवारण करुन त्यांना विविध सेवा उपलब्ध करुन देत न्याय देण्याचे कार्य केले आहे. तसेच वकिल ही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तातडीच्या मदतीसाठी १८१ हेल्पलाइन : तातडीच्या मदतीसाठी शासनाचा १८१ हा महिला हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित आहे. जालना जिल्ह्यातील गरजू आणि संकटग्रस्त महिलांनी कोणत्याही भितीशिवाय या क्रमांकावर किंवा सखी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र कड, आणि सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र व्यवस्थापक वनिता पिंपळे यांनी केले आहे.

# गावकऱ्यांची तहान भागवण्यासाठी अंकुश कासुळे यांनी स्वत:ची विहीर केली खुली



पाथर्डी प्रतिनिधी

तालुक्यातील भालगाव येथे तीव्र पाणीटंचाईमुळे ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे माजी सरपंच अंकुशराव कासुळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत त्यांची स्वत:ची खासगी विहीर गावकऱ्यांसाठी खुली करून दिली आहे त्यांच्या या स्तुत्य उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे पिण्याच्या पाण्याची समस्या काही काळापुरती दुर झाल्याने महीला व नागरीकांनी अंकुश कासुळे यांना आशिर्वाद देवुन त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे सध्या पावसाअभावी भालगावसह परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे अशा कठीण काळात अंकुश कासुळे यांनी पुढाकार घेत आपल्या विहिरीतील पाणी सर्वांसाठी उपलब्ध करून दिले आहे समाजासाठी पुढे येत केलेले समाजकार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पिंपळगाव टप्पा येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

पाथर्डी प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळगाव टप्पा येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या थाटामाटात आणि उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली यानिमित्ताने गावात सामाजिक बांधिलकी जपत प्रबोधन आणि सन्मानाचा अनोखा सोहळा पार पडला ग्रामपंचायत पिंपळगाव टप्पा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते




या कार्यक्रमासाठी वसंत बोर्डे पप्पू बोर्डे दिगंबर गाडे कडु लोंढे नितीन खंडागळे रोहिणी ठोंबरे मीना शिंदे किसन खंडागळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते पुणे येथे कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी राजेंद्र शिरसाठ यांनी सांगितले की शिका संघटित व्हा व संघर्ष करा या त्रिसूत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा मूलमंत्र आजच्या युवा पिढीने जपला पाहिजे तसेच अंधश्रद्धेपासून दूर राहून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा आणि गावातील समता बंधुता व सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहनही यावेळी राजेंद्र शिरसाठ यांनी केले यावेळी आम आदमी पक्षाचे पुणे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट सरपंच मेजर पांडुरंग शिरसाठ विजय शिरसाठ तसेच गावातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते


**टप्पा पिपळगाव येथील ४ तरुण भारतीय नौदल सेवेत डेरेदाखल**

गावातील युवक समर्थ वाघमारे विशाल वाघमारे राहुल वाघमारे अमोल शिरसाट यांची नुकतीच इंडियन नेव्ही (भारतीय नौदल) मध्ये निवड झाली आहे त्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला आपल्या गावातील तरुण देशाच्या सीमेवर रक्षण करण्यासाठी सज्ज झाल्याबद्दल ग्रामस्थांनी अभिमान व्यक्त केला यासोबतच समाजातील यशस्वी उद्योजक यांचा सन्मान करून त्यांच्या परिश्रमाचे कौतुक करण्यात आले.

# सीबीएसई बोर्डच्या दहावी परीक्षेत हर्षवर्धन राहुल लोणीकर यांचे सुयश

जालना । प्रतिनिधी

शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीचा प्रत्यय हर्षवर्धन राहुल लोणीकर यांनी नाथ व्हॅली स्कूल छत्रपती संभाजीनगर येथून सीबीएससी पॅटर्नच्या इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये ९५ टक्के गुण मिळवून सिद्ध केले आहे याविषयी सविस्तर वृत्त असे की आज सीबीएससी माध्यमाच्या इयत्ता दहावीचा निकाल घोषित करण्यात आला असून त्यामध्ये नाथ व्हॅली स्कूलचा विद्यार्थी असलेला हर्षवर्धन राहुल लोणीकर हा आ.बबनराव लोणीकर यांचा नातू व मा.प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा तथा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती राहुल लोणीकर यांचे चिरंजीव असून त्यांनी इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.हर्षवर्धन ने उत्तम बुद्धीचा धनी म्हणून वडिलासारखीच उत्तम कामगिरी करण्याचा मान मिळवला आहे.



''वडील आणि आजोबा राजकारणात सक्रिय असतानाही, त्यांच्या प्रेरणेने आणि आईच्या मार्गदर्शनाखाली हर्षवर्धन राहुल लोणीकर याने दहावीमध्ये ९५% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.''

या संदर्भामध्ये हर्षवर्धन राहुल लोणीकर यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की माझे आजोबा आणि वडील राजकारणात आणि समाजकारणात सक्रिय असूनही त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले व एक प्रेरणा दिली व तसेच माझी आई सौ दिव्याताई राहुल लोणीकर ज्या मुळातच डीएड, बीएड असून एक शिक्षक म्हणून उत्तम भूमिका त्यांनी निभावत मला वेळोवेळी मार्गदर्शन केले त्यामुळेच या यशाचा टप्पा मी गाठू शकलो असे मत यावेळी हर्षवर्धन राहुल लोणीकर यांनी व्यक्त केले आहे.

त्याच्या या यशाबद्दल आजोबा आ.बबनराव लोणीकर वडील राहुल बबनराव लोणीकर आजी सौ मंदाताई बबनराव लोणीकर , सौ वंदनाताई बबनराव लोणीकर, आई सौ दिव्या ताई राहुल लोणीकर , सौ मीना किशोर आबा पवार , सौ रोहिणी सुकृत पाटील , भक्ती बबनराव लोणीकर, श्रीजय बबनराव लोणीकर पंकजा राहुल लोणीकर यांच्या सह श्री सुनील बापू लोणीकर गजानन लोणीकर प्रशांत लोणीकर व परिवारातील सर्व सदस्यांनी हर्षवर्धन याचे अभिनंदन केले आहे

# आयुक्त अंजली शर्मा यांनी दिला १२४० दिवंगांना आधार

जालना(

जालना महानगरपालिकेच्या वतीने शहरातील दिव्यांग नागरिकांसाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचे यशस्वी वितरण करण्यात आले असून, या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. मा. आयुक्त अंजली शर्मा यांच्या पुढाकारातून हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत एकूण ४१ लाखांचा निधी वितरित करण्यात आला असून, १२४० दिव्यांग लाभार्थ्यांना थेट आर्थिक सहाय्य देण्यात आले. दिव्यांगत्वाच्या प्रमाणानुसार निधीचे वाटप करण्यात आले असून त्यामध्ये ४० ते ६०% दिव्यांगत्व असलेल्या लाभार्थ्यांना ₹३००० ६१ ते ८०% दिव्यांगत्व असलेल्या लाभार्थ्यांना ३५००

८१ ते १००% दिव्यांगत्व असलेल्या लाभार्थ्यांना ₹४००० याप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली.

मा. आयुक्त अंजली शर्मा यांनी निधी वितरण पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने तत्परतेने काम करत, सर्व अर्जांची काटेकोर छाननी केली. पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार करून ती बँकेकडे सुपूर्द करण्यात आली व निधी थेट खात्यात जमा होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. या उपक्रमामुळे शहरातील अनेक दिव्यांग नागरिकांना त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी मोठा दिलासा मिळाला असून, सामाजिक समावेशकतेच्या दिशेने जालना महानगरपालिकेचे हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. दरम्यान, निधी प्राप्त झाल्यानंतर दिव्यांग बांधवांनी मा. महापौर श्रीमती वंदना मगरे मा. उपमहापौर श्री राजेश राऊत✻ आणि स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर तसेच मा. आयुक्त ✻अंजली शर्मा यांचेआभार व्यक्त केले

**नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

जा.क्रं.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२०७
दिनांक:-१९/०६/२०२५

**-: जाहीर प्रगटन :-**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सिंधु नानाभाऊ सोमवारे रा.ता घनसावंगी जि. जालना यांनी नामे नानाभाऊ बाबासाहेब सोमवारे रा. ता. घनसावंगी जि. जालना मिळकत क्रं. ९६०/१ च्या नावे नोंद असनु वारसाआधारे नामांतर करणे बाबत आवक क्रं. ५०८ दि.२४/०२/२०२५ अर्ज सादर केला आहे.

अर्जासोबत ०१. नानाभाऊ बाबासाहेब सोमवारे रा.ता. घनसावंगी जि.जालना यांचे मृत्युप्रमाणपत्र दि. ०५/०१/२०२३ मा. विद्यामान दिवाणी न्यायधीश (क. स्तर) जालना यांचे वारस प्रमाणपत्र क्रं.civil-ma.no ५५/२०२३ दि. ०६/०५/२०२३ इतर वारस यांचे समंतीपत्र/शपथपत्र क्रं १२३० दि. २४/०२/२०२५ इत्यादी कागदपत्रे जोडली आहे. ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

चतुः सिमा : पुर्व :- रस्ता पश्चिम :- रस्ता, दक्षिण :- मुगाजी सोमवारे

उत्तर : रस्ता वरील चतु:सिमा मधील जागा वारसाआधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी

**जाहीर प्रगटन**
**मा. के. सी. गाने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात बीड, ता.जि. बीड**
**किरकोल दियाणी अर्ज क्रमांक १०३/२०२०**
CNR No. MHBI0200003252026
**(मार्फत ॲड. बी. एन. सावरे)**
**मैना प्रभाकर जोगदंड वि. निरंक**

अर्जदार :- १. मैना भ्र. प्रभाकर जोगदंड, वय ७२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. देवीबामुळगांव, ता. जि. बीड,२. संतोष पि. प्रभाकर जोगदंड, वय-४७ वर्षे, धंदा नौकरी, रा. देवीबाभुळगांव ता. जि. बीड, ३. देवराज पि. प्रभाकर जोगदंड, वय-४० वर्षे, धंदा-नौकरी, रा. देवीबाभुळगांव ता. जि. बीड ह. मु. दिनालालसिंग चाळ, कुर्ला पाईपलाईन्स, सत्यानगर न्यु गणेश दीर साकीनाका, मुंबई -४०००७२

विरुध्द निरंक मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात प्रभाकर पि. नामदेव जोगदंड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत प्रभाकर पि. नामदेव जोगदंड यांचा मृत्यु दिनांक ०९/०१/२०२६ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत प्रभाकर पि. नागदेव जोगदंड यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०९/०६/२०२६

आज दिनांक १६ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन,
**स्वाक्षरित**
**अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

**स्वाक्षरित**
**. लिपीक**

**संत वामनभाऊ अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी, लि. बीड.**
**अंतिम जाहीर सूचना**

**जा. क्र.कलम १०१/सन-२०२६.** **दिनांक - १६/०४/२०२६.**

**संत वामनभाऊ अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड अंबिका चौक, पांगरी रोड बीड, या संस्थेच्या थकीत सभासद व त्यांचे जामीनदार यांना अंतिमत: या जाहीर सूचनेव्दारे सूचित करण्यात येते की, आपण पूढील उल्लेखित कर्जदार व सहकर्जदार यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अन्वये लेखी सूचना व सुनावणी नोटीस पाठविलेल्या असतांनाही आपण त्यास कसलीही दाद दिली नाही मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. बीड यांनी दि. ३०/०३/२०२६, दि. ०९/०४/२०२६ व दि. १६/०४/२०२६ रोजी खालील उल्लेखीत यांना सुनावणीची संधी दिली असतांनाही आपण सूनावणीस गैरहजर राहीलात अथवा आपण लेखी म्हणने सादर केले नाही. अथवा रक्कम भरणा केली नाही त्यामूळे या नैसर्गिक न्याय तत्त्वाने पून्हा एक अंतिमत: संधी देण्यात येत आहे. कर्जदार व जामीनदार तथा सहकर्जदार यांनी कार्यालयीन वेळेत दि. २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११-०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. बीड या कार्यालयात उपस्थीत राहून आपली बाजू आपण स्वत: अथवा आपले प्रतिनीधी मार्फत मांडावी तथा आपले लेखी स्वरूपात सादर करावे तथा संपूर्ण कर्ज बाकी भरणा करावी, नसता आपणाविरूध्द एकतर्फी आदेश प्रमाणपत्रासह निर्गमीत करून पूढील कार्यवाही करणेत येईल व यासाठी होणा-या परीणामास व, खर्चास आपण स्वत: जबाबदार रहाल याची विशेष नोंद घ्याची.**

| दावा क्र. | कर्जदार व जामीनदार | | येणे बाकी दि.३१/१२/२०२५ अखेर |
|---|---|---|---|
| १३३ | श्री. यादव अभिषेक सुरेशराव, मु. पो. कुर्ला ता. जि. बीड | जाब देणार | रू. ३५,९८८/- |
| १३३A | श्री. यादव सुरेश सखाराम, मु. पो. कुर्ला ता. जि. बीड. | जाब देणार | |
| १३३B | श्री. यादव अक्षय सतीश, मु. पो. कुर्ला ता. जि. बीड. | जाब देणार | |
| १३५ | श्री. शेळके तीर्थराज श्रीकिसन, मु. धारवंटा पो. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड. | जाब देणार | रू. ५५,०५२/- |
| १३५A | श्री. शेळके श्रीकिसन उत्तमराव, मु. धारवंटा पो. साक्षाळपिंप्री ता.जि.बीड. | जाब देणार | |
| १३५B | श्री. शेळके हनुमान अशोक, मु. धारवंटा पो. साक्षाळपिंप्री ता.जि.बीड. | जाब देणार | |

**ठिकाण - बीड**
**दिनांक - १६/०४/२०२६.**

**कार्यालयीन मुद्रा**

**स्वाक्षरित**
**(सचिन घोडके)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, ता. बीड.**

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-०९**
**दिनांक - १५/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती विपुल व्यंकटराव पानगे रा. महाकाळा, अंकुशनगर ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विपुल व्यंकटराव पानगे | स्वतः | ११/०४/१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-०८**
**दिनांक - १५/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती विरेंद्र व्यंकटराव पाणगे रा. महाकाळा, अंकुशनगर ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विरेंद्र व्यंकटराव पाणगे | स्वतः | १०/०६/१९९४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# प्रताप ढाकणे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी - आव्हाड

पाथर्डी प्रतिनिधी

माजी केंद्रीय मंत्री स्व.बबनराव ढाकणे यांचे चिरंजीव ॲड प्रताप ढाकणे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा पक्षात घेऊन विधानपरिषदेवर संधी द्यावी अशी मागणी पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक निळकंठ



आव्हाड यांनी केली आहे महाराष्ट्र विधान परिषदेच्या नऊ रिक्त जागांसाठी निवडणूक होऊ घातली आहे अशातच ॲड प्रताप ढाकणे हे पूर्वाश्रमीचे भाजपचे नेते होते प्रताप ढाकणे यांचा राजकीय संघर्ष व चळवळ पाहता त्यांना शेवगाव पाथर्डी मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीत चार वेळा अल्पशा मताने पराभूत व्हावे लागले मोठा जनाधार असलेले ओबीसी नेते म्हणून ॲड प्रताप ढाकणे यांची ओळख आहे कायद्याचे अभ्यासक असलेले ॲड प्रताप ढाकणे यांचा ओबीसी चळवळ महाराष्ट्र व देशाच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचा गाढा अभ्यास आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ | ६

# कृषी प्रदर्शनात येणार थेट शेतकऱ्यांनी पिकवलेले विक्रीसाठी धान्य !

## भारतातला सर्वात मोठा ६ फुटी सरडा ठरणार आकर्षण

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या वर्षी प्रथमच बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडागणा मध्ये दिनांक ०१ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे बीड भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शन जय्यत तयारी सुरू असून यंदा कृषी प्रदर्शनामध्ये २०० अधिक स्टॉलचा सहभाग असणार आहे यात विशेष आकर्षण ठरणार आहे ते मुंबई येथील प्राणी मित्र किशोर चव्हाण यांचा भारतातील सर्वात मोठा ६ फुट लांब व तब्बल २० किलो वजन असणारा सरडा (इगवाना ) हा या प्रदर्शनात बीड जिल्ह्यातील



प्राणी प्रेमींना पाहण्यास मिळणार आहे तसेच शेतमजुरीला पर्याय ठरणारे अवजारांचे दालनात विविध लागणारे विळ्या खुरप्यापासून ते ऊस तोडणी यंत्रापर्यंत सर्व प्रकारच्या मजुरीला पर्याय ठरणाऱ्या अवजाराचे दालन विशेष आकर्षण ठरणार आहे तर शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये उत्पादित केलेला माल थेट स्वतः शेतकरी या प्रदर्शनात धान्य महोत्सवाच्या माध्यमातून विक्री करण्यासाठी ठेवणार आहेत या अनुषंगाने प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू असून या प्रदर्शनाचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या आग्रहाने गेवराई पाठोपाठ बीड येथे या प्रदर्शनाचे आयोजन प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना, ऑल इंडिया डीलर ॲग्रो इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे.

कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे, एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतक यांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रदर्शनात विविध कार्यक्रमाचे रिसेल चालणार असून ५ दिवसांमध्ये या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

**शासनाच्या मदतीविना हे प्रदर्शन होत असून गेल्या १८ वर्षापासून शासनाच्या कोणत्याही अनुदानाशिवाय ही संस्था हे प्रदर्शन सातत्याने आयोजित करते यावेळी प्रथमच जिल्ह्यातील उत्कृष्ट दर्जाचा उत्पादित केलेला धान्य माल थेट ग्राहकांच्या च्या दारात मिळावा या उद्देशाने शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या संस्थांना अल्प दरात स्टॉल दिला जाणार आहे स्टॉल बुकिंग साठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा ९८८१०४५३१५, ९४२२२९४३३८, ८६००४७४६०६**

# आ. सुरेश धस यांच्या हस्ते ट्रॅक्टर व कृषी अवजारांचे वितरण

आष्टी । प्रतिनिधी

आगामी खरीप हंगाम २०२६ पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यातील शेती व्यवस्थापन अधिक सक्षम, आधुनिक व उत्पादनक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. आष्टी तहसील कार्यालय येथे बुधवारी आ. सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या पूर्व नियोजन बैठकीत शेतकरी हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी कृषी क्षेत्रातील योजनांचा सखोल आढावा घेत शेतकऱ्यांच्या अडचणींवर थेट संवाद साधण्यात आला.



बैठकीचे प्रमुख आकर्षण ठरले ते म्हणजे कृषी विभागाच्या DBT (Direct Benefit Transfer) पोर्टल अंतर्गत शेतकरी बांधवांना अनुदानावर ट्रॅक्टर व विविध अत्याधुनिक कृषी अवजारांचे वितरण. आ. सुरेश धस यांच्या हस्ते हे वितरण पार पडले. बदलत्या काळात शेतीला तंत्रज्ञानाची जोड देणे अत्यावश्यक असून यामुळे उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या उपक्रमामुळे पारंपरिक शेतीतून आधुनिक शेतीकडे होणारा संक्रमण वेगाने होणार असल्याचेही स्पष्ट झाले. याचबरोबर, राज्य शासनाच्या गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजने अंतर्गत दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदानाचे हमीपत्र प्रदान करण्यात आले. संकटाच्या काळात या योजनेमुळे कुटुंबांना आर्थिक आधार मिळणार असून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, हा

◀◀ पान ३ वर

# भाजपचे नगरसेवक पती सागर देशपांडे यांच्या कुटुंबियांवरील खोटे गुन्हे मागे घ्या

## भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह शिष्टमंडळ एसपींच्या भेटीला

बीड । प्रतिनिधी

शहरातील धोंडीपुरा भागातील भाजपच्या नगरसेविका भाग्यश्री देशपांडे यांचे पती सागर देशपांडे यांच्यावर काही दिवसांपूर्वी झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर, त्यांच्यासह कुटुंबीयांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे तत्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी भाजपचे युवा नेते



डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.१६) पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे केली.

पुढे म्हटले आहे की, आरोपींकडून सागर देशपांडे यांच्यासह त्यांचे वडील अरुणराव देशपांडे यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर

◀◀ पान ३ वर

# गाडेवाडीत अंगणवाडी इमारतीचा शुभारंभ; मुलांची गैरसोय थांबणार



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील कोळगाव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गाडेवाडी येथे नवीन अंगणवाडी बांधकामाचा शुभारंभ विद्यमान सरपंच राजेंद्र कदम यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

गाडेवाडी येथे अनेक वर्षांपासून अंगणवाडीची स्वतंत्र इमारत नसल्यामुळे लहान मुलांना गावातील बनगर यांच्या घरात बसून शिक्षण घ्यावे लागत होते. या गैरसोयीची दखल घेत जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागामार्फत नवीन अंगणवाडी इमारतीस मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला. या पार्श्वभूमीवर गुरुवारी नवीन अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचा

◀◀ पान ३ वर



बीड - राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले हे बीड येथे आले असता त्यांनी हॉटेल सनराईजला सदिच्छा भेट दिली . यावेळी त्यांचा सत्कार करून स्वागत करताना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत दिसत आहेत.

# रोटी पिंपरीत दिवसाढवळ्या थरार; शेतात काम करणाऱ्या महिलेवर झटापट करून सोन्याचे दागिने लंपास

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असतानाच रोटी पिंपरी येथे दिवसाढवळ्या सकाळी ११वा हा घडलेल्या धक्कादायक प्रकाराने खळबळ उडाली आहे. शेतात काम करत असलेल्या महिलेवर चार अज्ञातांनी हल्ला करून तिचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने लंपास केल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोटी पिंपरी येथील रहिवासी राजू गोल्हार यांची पत्नी शेतात नेहमीप्रमाणे काम करत असताना दोन मोटारसायकलवरून चार अज्ञात इसम तोंड बांधून तेथे आले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला घाबरून गेली असताना आरोपींनी तिला खाली पाडले. त्यापैकी दोघांनी तिचे हातपाय घट्ट पकडले, तर उर्वरित दोघांनी धारदार चाकूचा धाक दाखवत अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने ओरबाडून घेतले.

घटनेदरम्यान महिलेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपींच्या धमकीमुळे ती असहाय्य ठरली. काही क्षणातच आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. दिवसाढवळ्या घडलेल्या या धाडसी चोरीमुळे रोटी गावासह परिसरातील वस्त्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, आष्टी तालुक्यात मागील काही महिन्यांपासून सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीच्या घटना सातत्याने वाढत आहेत. दोन महिन्यांपूर्वी आष्टी शहरात एका महिलेला

◀◀ पान ३ वर

# आशय संपन्न साहित्यातुन समृध्द कविता अनुभवानी साकार होतात -डॉ. जगन्नाथ एस. कांबळे



बीड । प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषद, भवानी विद्यार्थी प्रतिष्ठाण, व शांतीवन यांच्या विद्यमाने बाबा आमटे साहित्य नगरी- आर्वी जि. बीड येथे दोन दिवशीय मराठवाडा साहित्य संमेलन ४५ वे संपन्न झाले, त्यामध्ये कवी संमेलन, कथा कथन, परिसंवाद, बालकुमार मेळावा इ. साहित्यीक कार्यक्रम संपन्न झ गाले, त्या वेळी निमंत्रीतांच्या कवी संमेलनात विशेष रंग भरला होता सामाजीक जाणीवांच्या ह्दयों स्पर्शी कवितांनी तमाम रसिक मंत्रमुग्ध झाले होते. त्या वेळी प्रांरभी डॉ. जगन्नाथ एस. कांबळे यांचा शाल, श्रीफळ पुष्प गुच्छ देवुन संमेलनाच्या वतीने भाव पुर्ण सत्कार करण्यात आला, त्यावेळी सत्कारला उत्तर देताना डॉ. काबंळे म्हणाले की, आशय संपन्न साहित्यातुन आणि जीवंत अनुभवाच्या जाणिवातुन कविता समृध्द होऊन जीवंत होतात.

कवी डॉ. जगन्नाथ कांबळे यांच्या कविता नी रसिक भरावले संमेलनाचे अध्यक्ष बालाजी इंगळे होते या बहारदार कवी संमेलनाचे संचालन कवी अनंत कराड यांनी केले, मराठवाडा पातळी वरील कवी संमेलनात डॉ. प्रभाकर शेळके, शिवाजी मिरगीळ, प्रा. सत्यप्रेम लगड, श्रीकृष्ण उबाळे, श्रीराम गीरी, वृषाली किन्हाळकर, डॉ. रेखा ढेरे, दादासाहेब सादोळकर इ. नी कविता सादर केल्या स्वागताध्यक्षाची धुरा दीपक नागरगोजे यांनी यशस्वी संभाळली प्रारंभी प्रा. भास्कर बडे यांनी सर्वाचे स्वागत केले प्राचार्य - कौतिकराव ठाले पाटील, डॉ. दिगंत बाबा आमटे, डॉ. अनघा आमटे, मा. आ. सुरेश धस, प्रा. फ.मु शिंदे संमेलनाचे, अध्यक्ष, प्रा. फ.म. शहाजिदे, आ. संदीप क्षीरसागर, संपादक

◀◀ पान ३ वर

# मुस्लिम समाजाच्या हक्कासाठी एल्गार आरक्षण मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा -जुनेद पठाण

बीड । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण हा काळाची गरज बनला असून, येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी १७ एप्रिल रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चात सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाजसेवक तथा युवा नेते जुनेद भैय्या पठाण यांनी केले आहे.

यावेळी बोलताना जुनेद भैय्या पठाण म्हणाले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थाचा नसून संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही समाजाची जुनी व रास्त मागणी आहे.समाजातील अनेक तरुण आजही संधीअभावी मागे राहत आहेत. त्यामुळे आपल्या मुला-बाळांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, आज जर आपण एकजुटीने उभे राहिलो नाही तर येणाऱ्या काळात आपल्या पुढील पिढ्यांना संधींपासून वंचित राहावे लागू शकते. म्हणून प्रत्येक तरुण, ज्येष्ठ नागरिक, महिला व समाजातील सर्व घटकांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून या मोर्चात सहभागी व्हावे.

ही वेळ एकत्र येण्याची आहे, मतभेद विसरून समाजहितासाठी खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची आहे. आपल्या हक्कासाठी शांततेच्या मार्गाने आवाज उठविणे हीच खरी ताकद आहे, असेही त्यांनी सांगितले. १७ एप्रिल रोजी बीड येथे होणारा मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चा यशस्वी करून मुस्लिम समाजाची एकजूट राज्याला दाखवून द्यावी, असे आवाहनही समाजसेवक तथा युवा नेते जुनेद भैय्या पठाण यांनी शेवटी केले.

# शेतीसोबत दुधाचा जोडधंदा करा शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल - जयदत्त धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील तवलवाडी गावाने शेतीसोबत दुध व्यवसायाचा आदर्श निर्माण केला असून, शेतकऱ्यांनी जोडधंदा म्हणून दुध व्यवसाय स्वीकारल्यास त्यांच्या जीवनमानात निश्चितच मोठी सुधारणा होऊ शकते, असे प्रतिपादन युवा नेते जयदत्त धस यांनी केले.



तवलवाडी येथे राजमाता जिजाऊ दूध व शंभूराजे पशुखाद्य दालनाच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, मराठवाडा भूषण लोकनेते सुरेश आण्णा धस यांनी नेहमीच शेतकऱ्यांना शेतीसोबत दुध व्यवसाय करण्याचे आवाहन केले आहे. दुध व्यवसाय हा शेतकऱ्यांसाठी स्थिर उत्पन्न देणारा आणि नफा मिळवून देणारा व्यवसाय ठरत आहे.

तवलवाडी सारख्या छोट्याशा गावात दुध व्यवसायातून वर्षाकाठी सुमारे ११ कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचे उदाहरण समोर आले असून, हे इतर गावांसाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे तालुक्यातील इतर शेतकऱ्यांनीही याचा आदर्श घेऊन दुध व्यवसाय स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले.

जयदत्त धस पुढे म्हणाले की, आजच्या काळात शेती अत्याधुनिक पद्धतीने करणे आवश्यक असून, जोडधंदा म्हणून दुध व्यवसाय केल्यास शेतकऱ्यांचा आर्थिक पाया अधिक मजबूत होईल. दुध व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या संसाराला हातभार लागतो आणि आर्थिक स्थैर्य मिळते.

यावेळी त्यांनी आष्टी दूध संघाच्या प्रगतीचाही उल्लेख करत सांगितले

◀◀ पान ३ वर

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती वकील संघात साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव वकील संघात प्रति वर्षाप्रमाणे या वर्षी हीभारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वावंदनीय प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वकील संघाचे अध्यक्ष ड.मनसबदार तर प्रमुख पाहुणे म्हणून वकील संघाचे ज्येष्ठ विधीज्ञ ड.डोंगरदिवे,डशर्मा, ॲड.गोंडे, ॲड. साबळे, ॲड.बि.आर.डक, ड.सुतळे, ॲड.ए.डी.घाडगे हे होते.सदरील कार्यक्रमात ड.घनघाव यांनी भीम गीत गायले तसेच ड.एम.ए.डोंगरदिवे,ॲड.बलराज शिंदे यांनी डॉ.बाबासाहेब यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले.तर अध्यक्ष ड.मनसबदार यांनी अध्यक्षीय समारोप केला. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उपाध्यक्ष ड.जाधव यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वकील संघाचे सचिव ड.नारायण तेलगड यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास ड.कांबळे, ॲड. गोले,ॲड. खरात,ड.विजय मस्के, ॲड. राऊत,ॲड. गरड, ॲड. पायाळ, ॲड.लांडगे, ॲड.साळवे, ॲड.तिडके, ॲड.आडे,ॲड खेत्री, ॲड.बोचरे, ॲड.जाधव,ॲड.शिंदे, ॲड.डोंगरे सह अनेक विधीज्ञ उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मराठी खाद्यसंस्कृतीला ब्रँड स्वरूपात जागतिक पातळीवर घेऊन जाण्याचे काम चितळेंनी केले – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे । प्रतिनिधी

**आज 'फूड' ही जागतिक सॉफ्ट पॉवर समजल्या जाते. एकीकडे गेल्या काही वर्षांत भारतामध्ये वेगवेगळ्या देशातील खाद्यसंस्कृतीचा आस्वाद देणारी हॉटेल्स, रेस्टॉरंटस नागरिकांच्या पसंतीस उतरत असताना देशाच्या प्रत्येक भागात देखील अतिशय चांगली खाद्य संस्कृती आपल्याला पहायला मिळते आहे. महाराष्ट्रात दर ५ किमीला जशी भाषा बदलते तशी दर १० किमीला खाद्यसंस्कृती बदलते. आपल्या या मराठी खाद्यसंस्कृतीला जागतिक निकषांचे फिनिशिंग देत तिला 'ग्लोबल' स्तरावर ब्रँड स्वरूपात घेऊन जाण्याचे काम चितळे बंधू मिठाईवाले यांनी केले, असे गौरवोद्गार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.**

आपल्या चवदार व कुरकुरित बाकरवडीने जगभरात लोकप्रियता मिळवलेल्या व भारतातील प्रसिद्ध मिठाई, नमकीन व स्नॅक्सचे निर्माते असलेल्या चितळे बंधू मिठाईवाले यांच्या वतीने भोर तालुक्यातील रांजे येथे 'रांजे व्हिजन पार्क' या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. चितळे बंधू मिठाईवाले या संस्थेचे भागीदार असलेले गोविंद (संजय) चितळे, श्रीकृष्ण चितळे, इंद्रनील व केदार चितळे यांबरोबरच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, नगरसेवक राजेंद्र शिळीमकर आदी मान्यवर देखील यावेळी उपस्थित होते. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, चितळे बंधूंच्या चार पिढ्यांनी आजवर केवळ सातत्याने उद्योगच टिकवला नाही तर उद्योगाचा विस्तारही केला आहे. प्रत्येक पिढीने त्या त्या काळाच्या आव्हानांचा स्वीकार करून त्या आव्हानांना हिमतीने सामोरे जात आजचा हा चितळेंचा 'ग्लोबल ब्रँड' आत्मविश्वासपूर्वक उभा केला आहे, याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे.




आमची कोठेही शाखा नाही ते आज ३५ देशांमध्ये आम्ही आहोत इथपर्यंतचा चितळेंचा प्रवास हा दैदिप्यमान असाच आहे. लवकरच परदेशातील दुकानांच्या बाहेर चितळे बंधूंचे पदार्थ विकत घेण्यासाठी रांगा लागतील असा माझा विश्वास आहे. पुण्यात चितळे आणि बाकरवडी यावर जेवढ्या गोष्टी रंगल्या आहेत तेवढ्या दुसऱ्या कोणत्याच ब्रँडवर रंगल्या नाहीत असे सांगत फडणवीस पुढे म्हणाले की, आम्ही लहानपणी सुट्ट्यांमध्ये काकांकडे पुण्याला यायचो तेव्हा घरी जाताना काकी आम्हाला एक बाकरवडीचे पाकीट द्यायच्या पण नागपूरला जायच्या प्रवासातच त्या संपत आहेत हे लक्षात आल्यापासून त्या दोन पाकिटे द्यायला लागल्या. एक घरी घेऊन जायला आणि एक आम्हा मुलांना प्रवासात खायला. त्यामुळे आम्ही लहानपणापासून बाकरवडीचे फॅन आहोत. नागपुरात चितळे एक्स्प्रेस उघडलं तेव्हा ताज उघडल्याचा आनंद आम्हा नागपूरकरांना झाला होता, अशी आठवण देखील फडणवीस यांनी सांगितली. चितळे बंधूनी उभारलेले रांजे व्हिजन पार्क हे स्टेट ऑफ आर्ट फॅसिलिटी असून यामधील व्ह्यूइंग गॅलरी हे त्याचे प्रमुख आकर्षण आहे. येथून दिसणारे उत्पादनांचे प्रकार आणि पद्धती ही किती विशुद्ध आहे याचेच प्रात्यक्षिक आहे असे मला वाटते. या ठिकाणी आरोग्यदायी पद्धतीने आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय बनणारे पदार्थ शुद्धतेची साक्ष देतात. प्रगत देशातील इंडस्ट्री व्हिजीटशी आपण याची तुलना करू शकू, असेही फडणवीस यांनी सांगितले.


पारदर्शकता, विश्वास आणि परंपरा या तीन खांबांवर चितळे समूह उभा आहे. आजच्या फॅक्टरीचे उद्घाटन हा चितळे बंधूंच्या प्रवासातला एक महत्वाचा टप्पा असून हे रांजे व्हिजन पार्क समूहाच्या पुढच्या २५ वर्षांच्या ग्रोथ प्लॅनचा विचार करून उभारण्यात आले आहे असे सांगत इंद्रनील चितळे म्हणाले, देशातल्या प्रत्येक माणसाने रोज आमचा एक तरी पदार्थ खावा अशी आमची व्हिजन आहे. स्नॅकेबल पदार्थ म्हणजे काही वेस्टर्न नावेच डोळ्यापुढे येतात, ही सवय बदलून आपले मराठमोळे पदार्थ देशविदेशात खाल्ले जावेत यासाठीचे इनोव्हेशन आम्ही करित आहोत. निर्यातकेंद्रीत खाद्यउद्योगासाठी शासन सहकार्य करेल असे आश्वासन देखील यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

या भागात खाद्यपदार्थ क्षेत्रातील अनेक मोठमोठे ब्रंडस कार्यरत आहेत. खाद्यपदार्थ क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी पाण्याची उपलब्धता ही महत्त्वाची आहे. सदर खोरे हे पर्जन्यछायेच्या प्रदेशात येत असल्याने येथे नैसर्गिक स्रोतांव्यतिरिक्त पाण्याचा दुसरा पर्याय उपलब्ध नाही. म्हणून भोर भाटघरमधून एखादा कॅनॉल इथे आणता आला, तर पाण्याची उपलब्धता सुधारेल हे लक्षात घेत सरकारने या प्रश्नी लक्ष घालावे अशी मागणी यावेळी इंद्रनील चितळे यांनी केली.

## पुण्यात बेवारस वाहनांवर होणार कारवाई; २४ तासांत हटवा नाहीतर थेट होणार जप्त, वाहतूक पोलिसांची कारवाई सुरू

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर दीर्घकाळ उभी राहून वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी, बेवारस किंवा वापरात नसलेली वाहने आता थेट जप्त केली जाणार आहेत. पुणे वाहतूक (झींपिश ढीरषषळल णविरींश) पोलिसांकडून ही विशेष मोहीम बुधवार (दि. १५ एप्रिल २०२६) पासून सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान वाहतूक पोलिसांकडून महत्वाची पावले उचलली जाणार आहेत. सार्वजनिक रस्त्यांवर दीर्घकाळ उभी असलेली, धूळ खात पडलेली किंवा अयोग्य पद्धतीने पार्क केलेली वाहने शोधली जातील. संबंधित वाहनांवर नोटीस देण्यात येईल किंवा थेट नोटीस चिकटवली जाईल. नोटीस दिल्यानंतर ४८ तासांच्या आत पुढील कारवाई सुरू होईल. वाहन मालकाने २४ तासांच्या आत वाहन हटवले नाही, तर ते 'बेवारस' घोषित केले जाईल. अशा वाहनांना जप्त करून सुरक्षित ठिकाणी हलवले जाईल.



शहरातील रस्त्यांच्या कडेला दीर्घकाळ उभ्या ठेवलेल्या चारचाकी व दुचाकी वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने वाहतूक पोलिसांनी आता कठोर कारवाईचा निर्णय घेतला आहे. अनेक वाहनमालक सूचना देऊनही आपली वाहने हलवत नसल्याने अशी वाहने 'बेवारस' म्हणून घोषित केली जात आहेत. यापुढे नोटीस देऊनही वाहन हलवले नाही, तर थेट जप्तीची कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. शहरातील प्रमुख मार्गांसह विविध भागांत रस्त्याच्या कडेला दीर्घकाळ उभी असलेली, धूळखात पडलेली वाहने मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामुळे वाहतूक कोंडी वाढते आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने विशेष मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेत संबंधित वाहनमालकांना प्रथम नोटीस बजावण्यात येणार असून, २४ तासांत वाहन न हलवल्यास ते बेवारस घोषित केले जाईल. त्यानंतर पुढील ४८ तासांत वाहन जप्त करण्यात येणार आहे.नजप्त करण्यात आलेल्या वाहनांवर महापालिकेमार्फत दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. वाहन परत मिळवण्यासाठी संबंधितांना दंड भरावा लागणार असून, नियमांचे पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच नागरिकांनीही अशा बेवारस वाहनांची माहिती 'पीटीपी' ॲपच्या माध्यमातून पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिका आणि पोलिसांच्या संयुक्त कारवाईत बेवारस वाहनांसाठी स्वतंत्र ठिकाणे निश्चित करण्यात आली असून, ती उचलण्यासाठी टोईंग व्हॅनचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सुनेत्रा काकींचा प्रचार, पण निशाण्यावर भाजप! बारामतीत घडामोडींना वेग, रोहित पवारांची टीका

बारामती । प्रतिनिधी

महायुतीच्या उमेदवार असलेल्या सुनेत्रा पवारांच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीचे आमदार रोहित पवार प्रचार करत आहेत. मात्र ते भाजपवर निशाणा साधत आहेत. करुणा मुंडे यांच्या उमेदवारीवरून रोहित पवारांनी भाजपाला लक्ष केलं. तर भाजपचे नेते सुनेत्रा काकींचा प्रचार करण्यासाठी या ठिकाणी येत आहेत. परंतु असं करण्यामागे त्यांचा उद्देश वेगळा काय आहे हे माहीत नाही. पण जर तसं असेल तर त्यांनी बारामतीकरांना ओळखलं नाही असा टोला रोहित पवारांनी भाजपला लावला आहे. तर रोहित पवारांनी सुनेत्रा पवारांचा प्रचार केला यासंबंधी चंद्रकांत पाटील यांना विचारला असता ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. सुनेत्रा पवारांचा प्रचार आता रोहित पवार काय करत आहेत मात्र पुढे काय करतील हे सांगता येत नाही असं म्हणत रोहित पवारांना कोपरखळ्या लावल्यात. त्यामुळे भाजपने देखील रोहित पवारांवर निशाणा साधला आहे. तर दुसरीकडे रोहित पवार सुनेत्रा पवारांच्या प्रचारास उतरले असले तरी भाजपला टार्गेट करण्याला करायला ते विसरले नाहीत.

रोहित पवार यांनी बारामतीत सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले असून त्यांनी गाव भेट दौरा आयोजित केला आहे. या दौऱ्या दरम्यान बोलताना रोहित पवार म्हणाले, खरंतर बारामती पोटनिवडणुकीमध्ये जे २२ ते २३ अपक्ष उमेदवारांचे अर्ज राहिले आहेत. ते राहिला नको होते. अजित पवार यांच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करून जो उमेदवारीचा आकडा ६० होता तो २२ ते २३ वर आणला. मात्र अपक्ष उमेदवारांची नावे राहिली आहेत. त्यातील एक नाव मी पाहिलं तर ते करुणा मुंडे यांचे आहे. त्यांना भाजपच्या एखाद्या मोठ्या नेत्याने त्यांना सांगितलं असतं तर त्यांनी उमेदवारी अर्ज ठेवला नसता. याच्या मागचं कारण असं की महाविकास आघाडीचे सरकार गेलं आणि त्यावेळी आम्ही सर्व आमदारांनी सह्या करून अजित पवार यांना विरोधी पक्ष नेता म्हणून निवडलं होतं. त्यावेळी त्यांच्या नेतृत्वात धनंजय मुंडे हे भाजपवर जोरदार टीका करत होते. ज्या अधिवेशनात धनंजय मुंडे भाजपा विरुद्ध बोलत होते. त्याच अधिवेशनात एका भाजपच्या मोठ्या नेत्याने करुणा मुंडे यांना आमंत्रित केलं आणि त्या ठिकाणी प्रेस कॉन्फरन्स झाली. आणि त्या पत्रकारांशी बोलल्या आणि त्याच्या दुसऱ्या दिवसापासून धनंजय मुंडे यांनी भाजपावर टीका करणे सोडून दिलं. त्यामुळे मला वाटतं की भाजपच्या कोणत्याही नेत्याने करुणा मुंडे यांना सांगितलं असतं तर त्यांनी तो फॉर्म ठेवला नसता. मात्र तरी देखील लोक हुशार आहेत. ज्या लोकांनी बाहेरून येऊन या ठिकाणी उमेदवारी दाखल केली आहे. त्यांना एकही मतदान पडणार नाही. आणि जे बारामती मधील उमेदवार आहेत. त्यांचे स्वतःचे मतदान सोडलं तर त्यांच्या कुटुंबातील देखील मतदान त्यांना पडणार नाही, असंही रोहित पवारांनी म्हटलं आहे. बारामतीत बाहेरून येऊन राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना मतदार योग्य उत्तर देतील,' असे सांगत आमदार रोहित पवार यांनी भाजपवर टीका केल्यावर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही रोहित पवार यांना डिवचलं आहे. रोहित पवार यांनी 'बारामतीत बाहेरून येऊन समीकरणे बदलण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना मतदार योग्य उत्तर देतील,' अशी टिप्पणी भाजपचा नामोल्लेख न करता केली. चंद्रकांत पाटील हेदेखील बुधवारी बारामती दौऱ्यावर होते. प्रसार माध्यमांशी बोलताना पाटील यांनी 'आपल्या संस्कृतीनुसार राजकीय मतभेद असले, तरी कुटुंबातील कार्यक्रमामध्ये सर्वजण एकत्र येतात. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या उमेदवार असल्याने आमदार रोहित पवार प्रचार करतील. मात्र, पुढे काय होईल, ते पाहावे लागेल,' असे सांगत रोहित पवार यांना डिवचले.

## पीएमपीएमएल बसमध्ये महिला कंडक्टरवर चाकू हल्ला

पुणे । प्रतिनिधी

मद्यप्राशन केलेल्या एका माथेफिरू प्रवाशाने बसमध्ये महिला कंडक्टरवर (वाहक) चाकूने हल्ला केला. हल्ल्यात महिलेच्या मांडीला गंभीर दुखापत झाली असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुरेखा बळीराम भालेराव (वय.३८,रा. मुळशी, मुळ. मुखेड, नांदेड) असे जखमी झालेल्या कंडक्टर महिलेचे नाव आहे.

याप्रकरणी, भालेराव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बंडगार्डन पोलिसांनी अज्ञात आरोपीच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना बुधवारी (दि.१५) रात्री आठ वाजताच्या सुमारास अलंकार चौक परिसरात घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी भालेराव या पीएमपीएमएलमध्ये वाहक म्हणून नोकरीस आहेत. बुधवारी सायंकाळी सात वाजता त्या वाहक म्हणून मनपा ते एसआरए विमाननगर या बसमध्ये कर्तव्यावर होत्या. जुना बाजार चौकातून एक प्रवासी बसमध्ये चढला. त्याने जुना बाजार ते येरवडा असे तिकीट काढले. काही वेळाने तो प्रवाशी बसमधील इतर प्रवाशांना शिवीगाळ करून लागला. त्याने मद्यप्राशन केले असल्यामुळे प्रवाशांनी त्याच्याकडे सुरुवातीला दुर्लक्ष केले. तरी तो शिवीगाळ करत होता. त्याने फिर्यादींना इतर प्रवाशांची तिकेटे काढत असताना अडथळा निर्माण केला.अलंकार चौकात बस आल्यानंतर रात्री आठ वाजताच्या सुमारास फिर्यादींनी त्याला खाली उतरण्यास सांगितले. त्याचा राग आल्याने तो फिर्यादींच्या अंगावर धाऊन गेला. तसेच मोठ्याने शिवीगाळ करून त्यांना तिकीट काढण्यापासून परावृत्त करून लगाला.फिर्यादींनी बस थांबवून त्याला खाली उतरण्यास सांगितले. दरम्यान, त्याचा राग आरोपीला आला. त्यातूनच त्याने खिशातून चाकू काढून फिर्यादींच्या मांडीत मारला. जखम झाल्याने रक्तस्त्राव होऊ लागला. त्यावेळी आरोपीने तेथून पळ काढला. फिर्यादी महिलेचे साथीदारांनी त्यांना उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल केले.

## सेवाकार्यात समाजानेही सक्रिय सहभाग घ्यावा – मोहन भागवत

पुणे । प्रतिनिधी

निस्वार्थ बुद्धी आणि प्रामाणिकपणा असेल तरच सेवाकार्य यशस्वी होतात. खरी सेवा ही आपुलकीच्या भावनेतूनच निर्माण होते आणि याच आपलेपणामुळे समाजात आजही चांगुलपणा टिकून आहे. समाजानेही अशा सेवाकार्यात यथाशक्ती सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी येथे केले. निस्वार्थ बुद्धीने आपलेपणाने केलेली सेवा म्हणजे धर्म होय, असेही सरसंघचालक म्हणाले.

नांदोशी (पुणे) येथे 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'च्या कोनशिला



समारंभात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर मंजुषा नागपुरे, पंडित हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, आनंद भोसले आणि संस्थेचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आशाताई भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

लतादीदी आणि आशाताई यांच्या संवेदनेतून उमटलेल्या स्वरांचे सामर्थ्य अलौकिक असून, त्यांचे संगीत कधीही खंडित होणार नाही, अशी भावना डॉ. मोहन भागवत यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले, शिक्षण आणि आरोग्य या दोन गोष्टींचाही जीवनावश्यक गरजांच्या यादीत समावेश करणे आवश्यक आहे.प्रत्येकाला सुलभ व परवडणारे शिक्षण आणि आरोग्यसेवा मिळायला हवी. शासन व प्रशासन त्यांच्या परीने प्रयत्न करत आहेच; परंतु 'हा देश माझा आहे' या भावनेने आपणही अशा कार्यात खारीचा वाटा उचलला पाहिजे. सेवा भावातील आपलेपणा आणि चांगुलपणा म्हणजेच खरा धर्म आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगेशकर कुटुंबाच्या देशभक्तीचा गौरव केला. ते म्हणाले, मंगेशकर कुटुंबीय केवळ संगीतासाठीच नव्हे, तर प्रखर देशभक्तीसाठीही ओळखले जाते. विशेषतः स्वातंत्र्यवीर सावरकरांशी या कुटुंबाचे घनिष्ठ नाते राहिले आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने कधीही सेवेचा सौदा केला नाही, तर सेवाभाव जपून हजारो रुग्णांना उपचार दिले.

आजच्या काळात 'अफोर्डेबल केअर'ची मोठी गरज आहे. अनेकदा धर्मादाय संस्था आर्थिक संकटामुळे व्यावसायिकीकरणाकडे वळतात; मात्र पंडित दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने केवळ सेवा हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवला आहे.हाच वारसा आता 'लता-आशा' रुग्णालयाच्या रूपाने विस्तारणार आहे. या परिसराकडे येणारा रस्ता प्रशस्त करणे आणि पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, तसेच धर्मादाय संस्थांना सवलती देण्याचाही प्रयत्न राहील. असेही ते म्हणाले.

## जनगणनेत 'हिंदू लिंगायत' अशी स्वतंत्र नोंद व्हावी – डॉ. विनय कोरे

पुणे । प्रतिनिधी

कर्नाटक व तेलंगणा राज्यांच्या सीमेलगत असलेल्या जिल्ह्यांमध्ये लिंगायत समाजाची मोठ्या प्रमाणावर वस्ती असून राज्यातील इतर जिल्ह्यांतही समाज मोठ्या संख्येने पसरलेला आहे. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत लिंगायत समाजातील अनेक प्रतिनिधी विजयी झाले आहेत.

राज्यभरात सुमारे दीड कोटी समाजबांधव असल्याचा अंदाज असून, सध्या सुरू असलेल्या जनगणनेत 'हिंदू लिंगायत' अशी स्वतंत्र नोंद व्हावी यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे आवाहन जनसुराज्य शक्ती पक्षाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे यांनी केले.

वीरशैव लिंगायत संघाच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विजयी झालेल्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.




यावेळी डॉ. कोरे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. त्र्यंबक दापकेकर होते. राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे, भोकरचे नगराध्यक्ष भगवान दंडवे, सूर्यकांत विश्वासराव आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. विनय कोरे यांनी लिंगायत समाजाने एकजुटीने काम करण्याची गरज व्यक्त केली. आर्थिक विकास महामंडळातील जाचक अटींमुळे समाजाला अपेक्षित लाभ मिळत नसल्याचे त्यांनी सांगितले. या अटी शिथिल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधला असून येत्या काही दिवसांत हा प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.प्रास्ताविकात संजय कोडगे यांनी पक्षभेद विसरून समाजहितासाठी काम करण्याची गरज अधोरेखित केली. लिंगायत समाजासाठीच्या आर्थिक विकास महामंडळाला पुरेशी आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी त्यांनी केली.तसेच पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारावीत व प्रत्येक जिल्ह्यात अशी सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही त्यांनी मांडली. अनेक गावांमध्ये लिंगायत समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक आणि नगराध्यक्षांचा सत्कार करण्यात आला.राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी सांगितले की, खासदार झाल्यानंतर त्यांनी मंगळवेढा परिसराचा दौरा करून समाजाच्या विविध प्रश्नांचा आढावा घेतला. लिंगायत समाजासाठी स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.नवी मुंबई येथे वसतिगृहासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली असून पिंपरी-चिंचवडमध्येही जागा शोधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुण्यातही वसतिगृह उभारण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.राज्यसभेत महात्मा बसवेश्वर यांच्या नावाने 'संसदरत्न'सारखा पुरस्कार सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळासाठी शासनाने ५० कोटी रुपयांची तरतूद केली असली तरी समाजाच्या लोकसंख्येच्या तुलनेत ती अपुरी असून ती किमान एक हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवावी, अशी मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सोलापूर येथील अहिल्याबाई होळकर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या अध्यासन केंद्राच्या धर्तीवर नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातही पुढील एका महिन्यात असेच अध्यासन केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही डॉ. अजित गोपछडे यांनी केली.

## पुणे जिल्हा काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल! आता एक नाही तर दोन जिल्हाध्यक्ष सांभाळणार धुरा

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यात काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी दोन जिल्ह्याध्यक्ष नियुक्त करण्यात येणार आहेत. शिरुर, बारामती यांप्रमाणे दोन जिल्हाध्यक्ष नियुक्त करण्यात येणार येणार असून, येत्या १० दिवसांत नव्या जिल्ह्याध्यक्षांची घोषणा करण्यात येणार आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या आदेशावरून महाराष्ट्र राज्यात संघटन सृजन अभियान प्रकिया सुरू करण्यात आले.

त्यासाठी जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीसाठीचे निरिक्षक योगेश एच. सी., प्रफुल्ल गुडदे पाटील, रामहारी रूपनवर, प्रशांत जगताप, अनंत मोहोद, विश्वजित हाप्पे यांच्यासह देविदास भन्साळी, पुणे जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीरंग चव्हाण यांच्या उपस्थितीतीत बुधवारी (दि. १५ ) काँग्रेस भवन येथे पत्रकार परिषद झाली. यात योगेश एच. सी. यांनी ही माहिती दिली.

शिरूरसाठी एक व बारामतीसाठी एक याप्रमाणे पुणे जिल्ह्यासाठी दोन स्वतंत्र जिल्हाध्यक्ष नियुक्त केले जाणार आहेत. शिरुरसाठी १०, तर बारामतीसाठी ५ जण इच्छुक आहेत. शिरूरअंतर्गत शिरूर, जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ आणि बारामतीअंतर्गत बारामती, दौंड, इंदापूर, पुरंदर, भोर, खडकवासला या तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.निरीक्षकांनी जिल्ह्यातील १३ तालुक्यांचा चार दिवस दौरा करून प्रत्येक तालुक्यांतील ठिकाणच्या प्रमुख्य कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली आहेत. त्यानंतर जिल्हाध्यक्षपदासाठी इच्छुकांकडून ऑनलाइन अर्जही मागविल्याचे, असे योगेश एच. सी. यांनी सांगितले.